अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १५२ । सोमवार १६ मार्च २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## बेघर झालेल्या शिर्डीकरांना न्याय द्यावा
## डॉ. राजेंद्र पिपाडा यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



शिर्डी : शिर्डी व परिसरातील अनेक गावांमध्ये गेल्या ६० ते ७० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या दलित, वंचित, उपेक्षित व अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांच्या घरांवर अलीकडे कारवाई करण्यात येत असल्याने अनेक कुटुंबे बेघर झाली आहेत. या प्रकरणाची दखल घेत भाजप नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे या नागरिकांना न्याय देण्याची मागणी केली आहे. शिर्डी शहरातील लक्ष्मीनगर परिसर, देशमुख चारी, निमगाव, सावळीविहीर आदी भागांमध्ये अनेक कुटुंबे गेल्या अनेक दशकांपासून वास्तव्यास आहेत. मात्र अलीकडे जेसीबी व पोकलेनच्या सहाय्याने करण्यात आलेल्या कारवाईमुळे अनेकांची घरे पाडण्यात आली असून अनेक कुटुंबे अक्षरशः बेघर झाली आहेत. त्यामुळे परिसरातील वातावरण भावनिक व संतप्त झाले आहे.

### महत्त्वाचे..

## आर्थिक व्यवहारातून सेवानिवृत्त प्राध्यापकाला संपवलं

संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरमध्ये आर्थिक व्यवहारातून सेवानिवृत्त प्राध्यापकाचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपींनी प्राध्यापकाचा खून करून पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी चित्रपटासारखा बनाव रचल्याचे तपासात समोर आले आहे.मृत प्राध्यापकांचे नाव राजाराम उत्तम लोंढे असे असून ते शासकीय इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सिव्हिल विभागप्रमुख (कजृ) म्हणून कार्यरत होते. या प्रकरणात पोलिसांनी विशाल राठोड, आकाश पवार आणि करण आडे या तिघांना अटक केली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, मृत प्राध्यापक आणि आरोपींमध्ये सुमारे ५० लाख रुपयांचा आर्थिक व्यवहार झाला होता. 'खतरों के खिलाड़ी'सारखा टीव्ही शो तयार करून पैसे कम ावण्याच्या उद्देशाने हा व्यवहार झाल्याचे तपासात समोर आले आहे. मात्र, पैसे घेतल्यानंतरही बराच काळ कोणताही शो सुरू न झाल्याने प्राध्यापक लोंढे आरोपींकडे वारंवार पैशांची मागणी करत होते. सततच्या तगाद्यामुळे आरोपींनी प्राध्यापकांना दौलताबाद येथे पार्टीसाठी बोलावले. तेथे पार्टी झाल्यानंतर परत येताना आरोपींनी प्राध्यापकांच्या स्वतःच्या पिस्तुलातून त्यांच्या डोक्यात गोळी झाडून खून केला.

# सहा राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकांची घोषणा जाहीर

## बारामती आणि राहुरीची पोटनिवडणूक जाहीर, २३ एप्रिलला मतदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : केंद्रीय निवडणूक आयोगाकडून तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, केरळ आणि पुदूचेरी या राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली आहे. तामिळनाडू, आसाम, केरळ, पुदूचेरी या राज्यांची निवडणूक एका टप्प्यात होईल. तर पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यात निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसोबत देशातील विविध राज्यातील विधानसभांच्या ८ रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे.**

महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. राहुरी आणि बारामतीसाठी २३ एप्रिलला मतदान होईल तर मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानं अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झालेली आहे. तर, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारीला झालेल्या विमान अपघातात निधन झालं. यामुळं बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त आहे. या दोन्ही जागांची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे.

### बारामती आणि राहुरीचा पोटनिवडणूक कार्यक्रम

**निवडणुकीची अधिसूचना जारी :**
**३० मार्च २०२६**
**उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत :**
**६ एप्रिल २०२६**
**अर्जांची छाननी :**
**७ एप्रिल २०२६**
**अर्ज मागे घेण्याची मुदत :**
**९ एप्रिल २०२६**
**मतदानाची तारीख :**
**२३ एप्रिल २०२६**
**मतमोजणी : ४ मे २०२६**
**निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची तारीख :**
**६ मे २०२६**

### बारामतीची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता धूसर

राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून सुनेत्रा पवार बारामती विधानसभा पोटनिवडणूक लढणार आहेत, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी एबीपी माझाला माहिती दिली आहे. बारामतीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मेडिकल कॉलेजच्या संलग्न रुग्णालयाला अजित पवारांचे नाव दिल्याने काही प्रमाणात धनगर समाज नाराज झाला आहे.त्यामुळे नाराज झालेल्या पैकी कुणीतरी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष निवडणूक लढणार नसला तरी बारामतीची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी आहे.

### शरद पवारांच्या राष्ट्रवादीची निवडणूक न लढवण्याची भूमिका



राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष बारामती पोटनिवडणूक लढणार नाही. पक्षांतर्गत बैठकीत निवडणूक न लढण्याचा निर्णय झाल्याची माहिती वरिष्ठ सूत्रांकडून देण्यात आली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्यात विरोधात युगेंद्र पवार यांनी बारामती विधानसभा निवडणूक लढवली होती. अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर उमेदवार न देण्याची राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची भूमिका आहे.

### बारामतीत सुनेत्रा पवार लढणार

बारामतीची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस लढवणार असून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या जागेवर लढणार असल्याचं पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी एबीपी माझाला सांगितलं आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवार दिला जाणार नसल्याची माहिती आहे. यामुळं या जागेवर दुसरे कोणी उमेदवारी अर्ज भरणार की बारामतीची निवडणूक बिनविरोध होणार हे पाहावं लागेल.



## तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री गंभीर जखमी

**स्वतःवर वार केल्याची प्राथमिक माहिती, भक्तांमध्ये खळबळ**

अहिल्यानगर : तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री हे रविवारी सायंकाळी झालेल्या धक्कादायक घटनेत गंभीर जखमी झाले आहेत. त्यांनी स्वतःवरच वार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास महाराजांनी गडावर उपस्थित असलेल्या सर्व भक्तांना खोलीबाहेर थांबण्यास सांगितले आणि ते एकटेच खोलीत गेले. काही वेळानंतर त्यांनी स्वतःवर धारदार शस्त्राने वार केल्याची माहिती समोर आली. घटना लक्षात येताच उपस्थितांनी तत्काळ त्यांना रुग्णवाहिकेतून अहिल्यानगरमधील खासगी रुग्णालयात हलवले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुका तसेच बीड जिल्ह्यात आदिनाथ महाराज शास्त्री यांचा मोठा भक्त परिवार आहे. या घटनेची बातमी समोर येताच भक्तांमध्ये मोठी खळबळ उडाली असून अनेकांनी रुग्णालयात धाव घेतली आहे.

महाराजांनी हे पाऊल का उचलले यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेबाबत अधिकृत माहितीची प्रतीक्षा असून संबंधित यंत्रणा पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, आदिनाथ महाराज शास्त्री यांच्या प्रकृतीबाबत भक्त आणि नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात असून त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना केली जात आहे.



## उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या मदतीने कुवैतहून सुखरूप पोहोचला 'अभिनय'

ठाणे – अभिनेत्री विशाखा सुभेदार यांचा मुलगा अभिनय सुभेदार हा नुकताच कुवैतहून भारतात सुखरूपपणे परतला. यानंतर आज या माय लेकानी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या ठाण्यातील निवासस्थानी भेट घेऊन केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानले. यावेळी मी फक्त कर्तव्य भावनेतून मदत केली असल्याचे शिंदे यांनी त्यांना सांगितले. तसेच सुखरूपपणे मायदेशी परतल्यानंतर अभिनयची विचारपूस करून त्याला भावी वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेना सचिव आणि शिव चित्रपट सेनेचे अध्यक्ष सुशांत शेलार हेदेखील उपस्थित होते.

## शेवगाव–बोधेगावातील कुख्यात गुंड पिन्या कापसेवर
# भरचौकात धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** – शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील मुंडे चौकात आज दुपारी टोळीयुद्धातून भीषण रक्तरंजित संघर्ष पाहायला मिळाला. अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये संशयित असलेला आणि काही वर्षांपूर्वी बोधेगाव शिवारात एका पोलीस कर्मचाऱ्याच्या हत्येच्या प्रकरणातील मुख्य आरोपी कुख्यात गुंड पिण्या कापसे याच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात कापसे गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

भरदिवसा झालेल्या या प्रकारामुळे बाजारपेठेत मोठी खळबळ उडाली होती, मात्र पोलीस प्रशासनाने अत्यंत तत्परतेने घटनास्थळी धाव घेत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिण्या कापसे



हा मुंडे चौकातून जात असताना दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांनी त्याच्यावर अचानक हल्ला चढवला. धारदार शस्त्रांनी त्याच्या पायावर आणि शरीरावर वर्मी घाव घातल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. हा हल्ला इतका भीषण होता की, हल्ल्यानंतर काही काळ जखमी कापसे रस्त्यावर पडून होता आणि परिसरात भीतीचे सावट पसरले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी कोणताही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी कापसेला तातडीने सुरक्षितरीत्या वैद्यकीय मदतीसाठी हलवले. पिण्या कापसेची गुन्हेगारी पार्श्वभूमी अत्यंत वादग्रस्त राहिली असून, पोलिसांच्या हत्येसह त्याच्यावर म ारामारी, खंडणी आणि दहशत माजवण्याचे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.

घटनेनंतर बोधेगाव परिसरात निर्माण झालेला तणाव पोलीस प्रशासनाने अत्यंत संयमाने आणि कौशल्याने हाताळला असून सध्या परिसरात शांतता आहे. पोलिसांनी मुख्य चौकात आणि संवेदनशील भागात चोख बंदोबस्त तैनात केला असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी चोवीस तास गस्त सुरू केली आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शांतता राखावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले असून पोलिसांनी नागरिकांम ध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण केली आहे. सध्या फरार हल्लेखोरांच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली असून पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.




# कीर्तनकाराचा मुलीला पक्कडने चटके देत अमानुष अत्याचार!

अहिल्यानगर : वारकरी संप्रदायाला काळिमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना पारनेर तासुक्यातील ढवळपुरी येथे उघडकीस आली आहे. ढवळपुरी येथील शी दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आणी कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ (महाराज) याने एका १७ वर्षीय मुलीवर गेल्या पाच वर्षांपासून लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले आहे. केवळ अत्याचारच नव्हे, तर पीडितेला गरम लोखंडी पक्कडीने चटके देऊन अमानुष मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकारही समोर आला आहे.

समोरल आलेल्या माहितीनुसार, पीडित म ुलगी इयत्ता आठवीत असल्यापासून आरोपीची तिच्यावर वाईट नजर होती. आरोपी आणि पीडितेच्या कुटुंबांचे घरोब्याचे संबंध होते, तर पीडितेचा भाऊ त्याच्याच संस्थेत कार्यरत होता. याच विश्वासाचा फायदा घेत नराधम यशवंतने २०२१ पासून पीडितेवर वारंवार अत्याचार केले. मुलीने विरोध करण्याचा

### भोंदू गुंजाळ महाराजाला ठोकल्या बेड्या



प्रयत्न केला असता 'मी दोन हाफ मर्डर केलेले आहेत, कोणाला सांगितले तर तुझ्या कुटुंबाला संपवून टाकीन,' अशी धमकी देऊन त्याने तिला दहशतीत ठेवले होते. पीडिता घरी एकटी असली की आरोपी हा वारंवार बळजबरीने तिच्यावर अत्याचार करत असे.

या भीषण छळानंतरही त्याने तिच्यावर अत्याचार केला. १४ मार्च रोजी पीडितेच्या भावाने तिची गंभीर अवस्था पाहून तिला विश्वासात घेतले असता, पाच वर्षांपासून सुरू असलेला हा वेदनादायी आणि संतापजनक समोर आला.आरोपीला २० मार्चपर्यंत पोलीस कोठडी

### लोखंडी पक्कड गरम करून दिले चटके

**काही दिवसांपूर्वी या नराधमाने क्रूरतेचा कळस गाठला. पीडितेला फोन करून घरी बोलावले मात्र मुलीने येण्यास नकार दिला असता कुटुंबाल संपवण्याची धमकी दिली. धमकीला घाबरून पीडिता आरोपीच्या घरी गेली असता आरोपीने तिला कॉम्प्युटर रूममध्ये डांबले आणि बांबूने बेदम मारहाण केली. त्यानंतर गॅसवर लोखंडी पक्कड गरम करून तिच्या शरीरावर अमानुषपणे चटके दिले.**

## संपादकीय

# इराण युद्ध अमेरिकेला जड जात आहे?

इराण अमेरिका युद्धाला आता पंधरा दिवस होत आले तरी हे युद्ध थांबायचे नाव घेत नाही. ज्या वेळी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला करून इराणचे सर्वोच्च नेते आयातूला खामेनी यांची हत्या केली तेंव्हा इराण आणि इस्रायल या देशांनी दावा केला की आम्ही इराणच्या सर्वोच्च नेत्याला संपवून टाकल्याने इराण लवकरच आम्हाला शरण येईल आणि अवघ्या काही तासात किंवा फार फार तर दोन ते तीन दिवसांत हे युद्ध संपेल. जगालाही तसेच वाटले होते कारण अमेरिका आणि इराण यांची तुलनाच होऊ शकत नाही. अमेरिकेची शस्त्र सज्जता पाहिल्यास इराण त्यांच्यापुढे नगण्यच आहे त्यात अमेरिकेला इस्रायलची साथ त्यामुळे हे युद्ध लवकरात लवकर संपवून अमेरिका स्वतःचे मनसुबे पूर्ण करेल असेच सर्वांना वाटले होते पण झाले उलटेच. आयातूला खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणने अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्याचे ठरवले. इराणने अमेरिका इस्रायलला त्यांच्याच भाषेत उत्तर देऊन या दोन्ही देशांना जेरीस आणले. इतक्यावरच इराण थांबला नाही तर इराणने ज्या आखाती देशात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत तिथे हल्ला करुन ते नष्ट केले आणि अमेरिकेला हिसका दाखवला. इराण अमेरिकेचा इतका कडवा प्रतीकार करेल असे कोणालाही वाटले नव्हते खुद्द ट्रम्प यांनाही तसे वाटले नव्हते पण आता त्यांना त्याची जाणीव झाली असावी म्हणूनच ते आता युद्ध थांबवण्याची भाषा करत आहे. हे युद्ध अपेक्षेपेक्षा जास्त लांबले त्यामुळे ट्रम्प यांच्यावर अमेरिकेतूनही टीका होऊ लागली आहे. त्यात इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने या समुद्राधुनीमार्गे जगात होणारा इंधन पुरवठा थांबल्याने अनेक देशांनी रशियाकडून इंधन विकत घेतले

रशियाने चढ्या दरात इंधनविक्री सुरू केली त्यामुळे रशियाच गब्बर होऊ लागली. याचाच अर्थ इराण अमेरिका युद्धाचा खरा लाभार्थी रशिया ठरला. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ म्हणतात ते यालाच. भारतासह अनेक देशांनी रशियाकडून इंधन खरेदी करू नये यासाठी टेरीफ लावून ब्लॅकमेल करणाऱ्या ट्रम्प यांनाच त्या देशांना रशियाकडून इंधन खरेदी करा असे सांगावे लागले एकप्रकारे ट्रम्प यांचा हा अपमानच आहे. हे युद्ध जितके लांबेल तितकी त्याची जगाला किंमत मोजावी लागेल. या युद्धाचे परिणाम जगातील अनेक देशांवर होऊ लागले आहे. अनेक देशात गॅस आणि इंधन तुटवडा निर्माण झाला आहे. गॅस आणि इंधन तुटवड्यामुळे सर्वसामान्यांच्या जगण्यामरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे युद्ध अमेरिकेने लादले असल्याने जगभर ट्रम्प यांचा निषेध व्यक्त केला जात आहे. खुद्द अमेरिकेतही ट्रम्प यांचा मोठ्या प्रमाणात निषेध व्यक्त व्यक्त होत आहे. ट्रम्प यांच्या निषेधासाठी अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरत आहे. एकीकडे ट्रम्प यांचा निषेध केला जात असतानाच दुसरीकडे इराणच्या प्रति जगाची सहानुभूती वाढत चालली आहे. एकूणच हे युद्ध ट्रम्प यांना जड जात असून आता हे युद्ध लवकरात लवकर संपवण्याची त्यांची मानसिकता बनली आहे. अर्थात इराण याला सहजासहजी संमती देईल असे वाटत नाही त्यामुळे ट्रम्प यांनी हे युद्ध लवकर संपेल असे म्हटले असले तरी तसे होईलच असे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही.

# संजीवनी फार्मसी महाविद्यालयाच्या १२ विद्यार्थ्यांची मॅकलिओड्स फार्मास्युटिकल्समध्ये नोकरीसाठी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव:** संजीवनी शिक्षण संस्थेच्या संजीवनी फार्मसी महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांची नामांकित मॅकलिओड्स फार्मास्युटिकल्स कंपनीमध्ये नोकरीसाठी निवड झाली असून या यशामुळे महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या कार्याला मोठे यश मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे संस्थेचा शैक्षणिक दर्जा व उद्योग क्षेत्राशी असलेला प्रभावी समन्वय अधोरेखित झाला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये बी. फार्मसीच्या श्रध्दा भोजराज झाडे, भक्ती घनश्याम खंडूजा, श्रावणी किशोर सहारे, प्रविण लक्ष्मण चव्हाण, तुषार गणेश ठोंबरे, आकाश संतोष गायकवाड व एम फार्मसीचे अजय सुनिल बनकर, आदित्य सुनिल बेंबडे, भाग्यश्री सुनिल माळवे, प्रतिक कैलास पवार, अथर्व अनिल शिंदे , पुजा विजय घुगे यांचा समावेश आहे.



महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राच्या गरजांनुसार प्रशिक्षण देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटच्या माध्यमातून उत्तम संधी उपलब्ध होत आहेत. उद्योग क्षेत्र व शैक्षणिक संस्था यांच्यातील परस्पर समन्वयामुळे विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी सहज उपलब्ध होत असून त्याचा मोठा फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होत आहे.

संजीवनी फार्मसी महाविद्यालयाला ऑटोनॉमस (स्वायत्त) दर्जा प्राप्त असल्यामुळे उद्योग जगताला अपेक्षित असलेल्या आधुनिक व कौशल्याधारित अभ्यासक्रमाचा समावेश शिक्षणामध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक तांत्रिक कौशल्ये विकसित होऊन ते उद्योग क्षेत्रासाठी सक्षम बनत आहेत. संजीवनी शिक्षण संस्थेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण घेऊन चांगल्या नोकरीत स्थिरावण्याचे स्वप्न पूर्ण होत असल्याचे या निवडीमुळे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. संजीवनीचे विद्यार्थी शैक्षणिक, क्रीडा, संशोधन आणि इतर विविध क्षेत्रांप्रमाणेच प्लेसमेंटच्या बाबतीतही आघाडीवर असल्याचे सिध्द होत आहे. या यशाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष नितीन कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी डायरेक्टर डॉ. विपुल पटेल, हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नन्स डॉ. रावसाहेब शेंडगे व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे डीन डॉ. प्रमोद कडू उपस्थित होते.

# जागतिक ग्राहक दिनी नियोजनाचा अभाव, ग्राहक पंचायतकडून ठिय्याडरे निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** जागतिक ग्राहक दिनी रविवारी जिल्हास्तरीय कार्यक्रम नेवासा येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता मात्र जिल्हास्तरीय कार्यक्रम असून तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांच्या व्यतिरिक्त कोणताही अधिकारी येथे उपस्थित नव्हता. जिल्हा पुरवठा विभागाच्या नियोजनाच्या अभावामुळे कार्यक्रम कोलमडला याचा अखिल भारतीय ग्राहक पंचायत व ग्राहक पंचायत महाराष्ट्र कडून यांच्याकडून ठिय्याडरे निषेध करण्यात आला

जागतिक ग्राहक दिनाच्या निमित्ताने नेवासा तहसील कार्यालयात कार्यक्रम आयोजित केला होता, हा जिल्हास्तरीय कार्यक्रम असून देखील जिल्हा पुरवठा कार्यालयाने कुठलेही त्याचे नियोजन केलेले नव्हते जिल्हा प्रशासकीय अधिकारी त्या कार्यक्रमाला उपस्थित नव्हते,कुठलेही इन्स्टॉल लावलेले नव्हते आणि एकंदरीत सगळी परिस्थिती बिकट होती, तिथे फक्त ग्राहक संघटनांचे अखिल भारतीय ग्राहक पंचायत व ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संघटनेचे एकूण १५ ते २० उपस्थित होते

बाकी सर्व रेशन दुकानदार व पंधरा-वीस जण या जिल्हास्तरीय कार्यक्रमाला उपस्थित होते त्यामुळे याचा जाहीर निषेध करत ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी निषेध व्यक्त केला.आणि याची जाणीव होण्यासाठी कुठलाही सत्कार न करता व चहापाणी न करता त्या कार्यक्रमांमधून ग्राहक मंचचे सर्व पदाधिकारी निघून गेले.

कार्यक्रमाला एकही पदाधिकारी व कार्यकर्ता स्टेजवर बसला नाही,फक्त तहसीलदार साहेब स्टेजवर बसले होते सर्व कार्यकर्ते व नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉक्टर करणसिंह घुले हे ही ग्राहक संघटनांच्या कार्यकर्त्यांबरोबर खाली बसले होते.

# राजकारण विकासाचे करतो : आ. आशुतोष काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** राजकारणात फक्त आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा प्रत्यक्ष विकासकामे करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे मागील सहा वर्षात विकासकामांवर भर देवून दशकानुदशके प्रलंबित असलेली विकास कामे पूर्ण केली असून राजकारण विकासाचे करतो आणि जे करतो तेच जनतेसमोर मांडतो असे स्पष्ट मत आमदार आशुतोष काळे यांनी व्यक्त केले आहे. आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत १३.३७ कोटी रुपये निधीतून कोपरगाव मतदारसंघातील डाऊच, हिंगणी व शिंगवे येथील गोदावरी नदीवरील केटीवेअरजवळ पूर संरक्षक भिंत बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन व पी एम श्री जिल्हा परिषद शाळा शिंगवे येथील आयडियल संगणक कक्ष व गोदावरी इक्युपमेंट्स प्रा.लि. यांच्या वतीने दुरुस्त करण्यात आलेल्या शाळा खोल्यांचे लोकार्पण रविवार (दि.१५) रोजी आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुढे बोलतांना ते म्हणाले की, मंजूर बंधारा वाहून जाण्यापूर्वीच त्या बंधाऱ्याच्या देखभालीची जबाबदारी आपल्या कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याकडे देण्याची मागणी केली होती परंतु ज्यांच्याकडे देखभालीची जबाबदारी होती त्यांनी नकार दिल्यामुळे मंजूर बंधारा तीन वेळा वाहून गेला आणि शेतकऱ्यांच्या जमिनी पण वाहून गेल्या. तशीच परिस्थिती पावसाळ्यात गोदावरी नदीला पूर आल्यानंतर डाऊच, हिंगणी व शिंगवेच्या बंधाऱ्याची होवू नये यासाठी या बंधाऱ्यांच्या संरक्षक भिंत बांधण्यासाठी महायुती शासनाकडून १३.३७ कोटी रुपये निधी आणला आहे. त्यामुळे या बंधाऱ्यांना कोणताही धोका राहणार नाही. मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या सोडवणे आणि विकासकामांना गती देणे हेच माझे मुख्य उद्दिष्ट असून हे उद्दिष्ट्य पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून निधी मिळवत असतो मात्र ज्यांचा या कामांशी काहीही संबंध नाही त्या व्यक्ती हे काम आम्हीच केले असे खोटे सांगून नागरीकांची दिशाभूल करून श्रेय घेण्याचा प्रयत्न करतात. आजपर्यंत नागरीकांना अपेक्षित असलेली विकासकामे पूर्ण केली आहेत आणि यापुढील काळातही विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागणार आहेत. या व्यतिरिक्त तुमच्या मनात विकासाच्या ज्या संकल्पना असतील तर त्या अवश्य सांगा त्या संकल्पना पूर्ण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करीन अशी ग्वाही आमदार आशुतोष काळे यांनी याप्रसंगी उपस्थितांना दिली.

# झुलेलाल मंदिरात सिंधी समाजाच्या वतीने चेटीचंड उत्सवाचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील वॉर्ड नं.१ मधील झुलेलाल मंदिरात चेटीचंड उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार , दि.२० मार्च २०२६ रोजी झुलेलाल मंदिरात झुलेलाल विकास मंडळ व झुलेलाल उत्सव कमिटीच्या वतीने यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.गुरुवार दि.२० मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वा. महाआरती, दुपारी १ वा. दुपारी शरबत व प्रसाद वाटप करण्यात येणार आहे नंतर गांधी पुतळा चौकातील सिंधी समाजाचे व्यापारी आपली दुकाने बंद ठेवून त्यांच्या वतीने शरबत वाटप करण्यात येणार आहे, संध्याकाळी ८:३० ते ९:३० वाजेपर्यंत भजनाचा कार्यक्रम होईल.

कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन झुलेलाल मंदिराचे विश्वस्त अशोक भागवाणी, प्रतापराव बठेजा,मोहनलाल कुकरेजा, संतोष बत्रा, भजनलाल तलरेजा, गिरीधारीलाल आछडा, प्रकाश चुग, श्याम चुग, नरेश वलेशा ,सुनील कुकरेजा तसेच सेवेधारी आशिष बठेजा, मनोहरलाल रामनाणी, अमित भागवाणी,मुकेश भागवानी ,किशोर ग्यानचंदाणी,किशोर छतवाणी, जयकिशन तलरेजा, मनोहरलाल बठेजा, मंगेश छतवाणी, रवी भागवाणी, मुकेश भागवाणी, बन्सीलाल फेरवाणी, गिरीश बत्रा, आनंद तलरेजा, लखन भागवाणी, जयदेव ताराणी, जवाहर कुकरेजा, हिरालाल तलरेजा, संजय माखिजा ,जितेंद्र चूग, रवींद्र चुग,राजेश भागवानी मनोहरलाल रामनाणी आदींनी केले.

# इफ्तार पार्टीतून सामाजिक सलोख्याचा संदेश; माजी आ. भानुदास मुरकुटे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रमजान महिन्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या इफ्तार पार्टीतून समाजात बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला जातो, असे प्रतिपादन अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी केले.

शिवसेना (शिंदे गट), अशोक उद्योग समूह व लोकसेवा विकास आघाडीच्या वतीने माजी आ. मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि.१३) सायंकाळी श्रीरामपूर येथील जामा मस्जिद परिसरात इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शहरातील मुस्लिम बांधवांसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रमजान हा मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा महिना मानला जातो. या महिन्यात मुस्लिम बांधव पहाटेपासून संध्याकाळपर्यंत रोजा (उपवास) पाळतात. सायंकाळी मगरीब नमाजपूर्वी इफ्तार करून हा रोजा सोडला जातो. या पवित्र परंपरेत संयम, आत्मसंयम आणि सामाजिक बंधुभाव यांना विशेष महत्त्व आहे.

या प्रसंगी जामा मस्जिदचे खतीब-इमाम मौलाना इमदाद अली, हाफिज मुस्लिम, हाफिज शाहनूर, मोहम्मद तन्वीर रजा व माजी उपनगराध्यक्ष जलील पठाण यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास अशोक बँकेचे चेअरमन अँड.



सुभाष चौधरी, अशोक कारखान्याचे संचालक हिम्मतराव धुमाळ, सोपानराव राऊत, विरेश गलांडे, निरज मुरकुटे, ज्ञानेश्वर काळे, मुळा प्रवराचे संचालक सिध्दार्थ मुरकुटे, नगरसेवक संतोष कांबळे, डॉ. दिलीप शिरसाठ, कलीम कुरेशी, शाहिद कुरेशी, लोकसेवा विकास आघाडीचे शहराध्यक्ष नाना पाटील, गणेश छल्लारे, माजी नगरसेवक मुख्तार शाह, रियाज पठाण, डॉ. राज शेख, अकिल शेख, जोएफ जमादार, शरीफ मेमन, जमशेद पटेल, कैलास भागवत, साजिद मिर्झा, रफिक बागवान, जमीर बागवान, जमील कुरेशी, विक्रम नाईक, बशीर पटेल, रशिद कुरेशी, अंबादास पवार, जब्बार पठाण, अनिल गिरमे, सोहम मुळे, राहुल फरगडे, दत्तात्रय सलालकर, जावेद शेख, जियान पठाण, अमोल कलांगडे, अशपाक शेख, पांडू वाघमारे, मुन्ना शेख, शाहरुख काझी, आवेज बागवान, इम्रान शेख, साहिल शेख, अन्वर शेख, गणपत कोळसे, रोहित शिरसाठ, प्रसाद नेमाने आदी उपस्थित होते.

# संत तेरेजा शैक्षणिक संकुलात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**शिरसगाव :** संत तेरेजा शैक्षणिक संकुल हरेगाव या ठिकाणी संत तेरेजा प्राथमिक शाळा हरेगाव या विभागात दि. १० मार्च २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहाने पार पाडले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रजा जागृती शिक्षण संस्थेचे सचिव, संत तेरेसा प्राथमिक शाळेचे मॅनेजर व संत तेरेसा चर्च प्रमुख धर्मगुरू रे फा.डॉमनिक रोझारिओ हे होते तर उद्घाटन संत तेरेजा शैक्षणिक संकुलाचे सुपरवायझर व प्रजा जागृती शिक्षण संस्थेचे सहसचिव रे.फा.फ्रान्सिस ओहोळ यांनी केले. कार्यक्रमाच्या उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती श्रीरामपूर शिक्षण विभागाचे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दीपक त्रिभुवन व उंदीरगाव केंद्राचे केंद्रप्रमुख बाबासाहेब बिलगर उपस्थित होते व संत तेरेसा शैक्षणिक संकुलाचे प्राचार्य जालिंदर बलमे उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांमध्ये उंदीरगावचे सरपंच प्रतिभा गोलवड व ग्रामपंचायत सदस्य रमेश पंडित संत तेरेसा प्राथमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक पारधे संत तेरेजा चर्चे पॅरिस कौन्सिल सदस्य सुभाष पंडित व मार्गरिटताई पंडित दिव्यकृपा यूट्यूब चैनलचे राजेंद्र मगर हे उपस्थित होते. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी विविध असे कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मने जिंकून घेतली व मनमोहक असे कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमास पालकांनी भरभरून प्रतिसाद दिला उत्साहवर्धक वातावरणात स्नेहसंमेलन घडून आले त्याबद्दल संस्थेचे सचिव रे.फा.डॉमिनिक यांनी सर्वांचे कौतुक केले. संत तेरेसा प्राथमिक शाळेमध्येच नव्याने सुरू झालेल्या म्युझिक क्लासरूमचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शैक्षणिक संकुलामध्ये इयत्ता पहिलीला प्रवेश घेतल्यानंतर बारावीपर्यंत शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध आहे .

# छत्रपतींच्या नावाला साजेसे काम शिबिरातून व्हावे : आ. लंघे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शासनाचे प्रत्येक निर्णय लोकाभिमुख आहेत. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर हे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी वरदान ठरणारे आहे. मात्र, यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांची साथ महत्त्वाची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाला साजेसे कामे या महाराजस्व समाधान शिबिरातून व्हावीत अशी अपेक्षा आमदार विठ्ठलराव लंघे यांनी व्यक्त केली.



नेवासा फाटा येथे भानसहिवरे मंडल आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे उदघाटन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजनाने आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते व भूसंपादनचे उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, तहसीलदार डॉ. संजय बिरादार,तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे,भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक संदीप गोसावी,नायब तहसीलदार संदीप चिंतामणी,प्रशांत गोसावी,पुरवठा अधिकारी सुदर्शन दुर्योधन,मुकींदपूरचे सरपंच सतीश निपुंगे,भानसहिवऱ्याचे सरपंच किशोर जोजार,सौंदाळयाचे सरपंच शरद आरगडे,हंडीनिमगावचे सरपंच भिवाजीरावआघाव,निवृत्ती काळे,गोरखनाथ कोतकर, भाजपचे ज्ञानेश्वर पेचे, तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे, अंकुश काळे, धरणग्रस्त नेते दिगंबर आवारे यांच्या उपस्थित झाले.

याप्रसंगी बोलतांना उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी म्हणाले की कामात दिरंगाई आणी चुकीची कामे खपवून घेतली जाणार नाहीत. शासनाच्या प्रत्येक योजना व उपक्रमाची नियोजनबद्ध अमलबजावणी झाली पाहिजे. जनतेची कामे वेळेत करून ती मार्गी लावण्याचे आवाहनही त्यांनी केल स्वागत तहसीलदार डॉ संजय बिरादार यांनी तर प्रास्ताविक मंडलाधिकारी सरिता मुंडे यांनी केले. यावेळी आमदार लंघे यांच्या हस्ते उपस्थित विविध लाभार्थींना विविध दाखले व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. भानसहिवरे, खुणेगाव, मुकिंदपूर, मक्तापूर, पिचडगाव, सौंदाळा, नागपूर, उस्थळदुमाला, हंडीनिंमगाव, बाभुळवेढा, रांजणगाव, कारेगाव या भानसहिवरे मंडळातील गावांतील शेतकरी, नागरिक, विद्यार्थ्यांनी अशा सुमारे ३९२ लाभार्थ्यांनी शिबिराचा शिबिरस्थळी लाभ घेतला आहे. सूत्रसंचालन डॉ. रेवणनाथ पवार यांनी केले.

### आ. लंघेंकडून नियोजनाचे कौतुक

दरम्यान शिबिर उद्घाटन प्रसंगी शिबिराचे उत्कृष्ट नियोजन, येथील सुविधा याबाबत आमदार विठ्ठलराव लंघे यांच्यासह उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, तहसीलदार डॉ संजय बिरादार यांनी आपल्या भाषणात शिबिराचे आयोजक मंडलाधिकारी सरिता मुंडे यांच्यासह आकाश जोशी, श्वेता काळे, रमेश रिंढे, अशोक गाडेकर, सोमनाथ गलांडे या भानसहिवरे मंडळातील ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी हस्तांतरण सोहळ्याचे प्रक्षेपण कृषि विद्यापीठात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २२ व्या हप्त्याचे वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आसाममधील गुवाहाटी येथील ज्योती विष्णू आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक केंद्रातून करण्यात आले. देशातील नऊ कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण १८ हजार ६४० कोटी रुपयांची रक्कम थेट हस्तांतरित करण्यात आली.

या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपण राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठात करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी व शास्त्रज्ञांनी हा कार्यक्रम पाहिला.

यावेळी कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजू अमोलिक, पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे, मृदाशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश दोडके, वनस्पती रोगशास्त्र व कृषी अणूजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र गायकवाड, जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विवेक चिमोटे, सेंद्रिय शेती प्रकल्प प्रमुख डॉ. उल्हास सुर्वे, कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे यांच्यासह अन्य शास्त्रज्ञ, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**रमजानुल मुबारक २०२६**
**रोजा नंबर २४**

# लैलातुल कद्र :- तौबा मेरी तौबा...तु माफ करेंगा मेरे सारे गुन्हा..

या रात्रीं बद्दल दिव्य कुर आन मध्ये, सुरह ९३ अल -कद्र मध्ये अल्लाह( परमेश्वर). म्हणतात, '' आम्ही या ( कुरआना ) च्या प्रकटीकरणाची( सुरुवात )भाग्य निश्चित करण्याच्या रात्रीं केलेली आहेत (१), तुम्हाला काय माहित, या रात्रीं चे महत्व काय आहेत??, (३), ती, एक रात्रं हजार महिन्यानंच्यापेक्षा हीं उत्तम आहेत (४)., त्या रात्रीं असंख्य स्वर्गदुत त्या (प्रमुख स्वर्ग दुता पैकी एक असलेलें जिब्राईल आमीन ) पालनकर्त्याच्या परवानगीनें प्रत्येक गोष्टीसंबधीचे प्रत्येक आदेश जमिनीवर उतरतात (५). पहाट होयी पर्यंत ती पवित्र कद्र ची रात्रं शांतता व सुरक्षिततेची रात्रं आहेत. (६).

या पवित्र लैलतुल कद्र ची एक रात्रं आज आपल्याला भेटत आहेत, तर अशा पवित्र रात्रीत भरपूर आपल्या जीवनात केलेल्या वाईट कृत्यांची मनमोकळ्या मनानं माफी. म्हणजेच तौबा करणं.

तौबा या अरबी शब्दाचा अर्थ'' लौटाना, वापस लौटाना '' टु रिटर्न'' किंवा '' पश्चात्ताप '' चुकीच्या विचार- आचारांवर , चुकीच्या वर्तुनुकी व कृतीवर केलेल्या चुकीला पश्चात्ताप करणं .

प्रेषित मुहम्मद सल्लम.चे आवडते नातु हजरत हुसैन बिन अली रजि.म्हणतात , पहिला अनिवार्य जिहाद तो आहे की ,जो व्यक्ती अल्लाह च्या नावडत्या कार्यापासून दुर राहण्यासाठी स्वतःच्या मनाला ताब्यात ठेवतो.''. दिव्य कुरआन म्हणते '' अल्लाह जवळ क्षमा - माफी मांगा , अल्लाह निससंदेह खुप क्षमाशील व दयावान आहे '' ( सुराहा नं.९ वा, सुरह तौबा आ.न.४ थी .)

म्हणजेच आपल्या सर्व पापांची क्षमा मागण्याचे दिवस ..तर आपण केलेल्या छोट्या छोट्या व मोठ्या पापांची कबुली देउन क्षमा मागणे .जसे , व्यवहारात कमी जास्त प्रमाणात खोटे नाटे करणे , आईवडील - बहीन भाउ , मुलं, मित्र नां काहीतरी वेडेवाकडे बोलणं , आईवडीलांना नाराज करणे,कोणी आपल्या मेहनती च्या जोरावर पुढे प्रगती करत असतोस परंतु पाठीमागे वेडेवाकडे बोलणं, नस्ती आळ घालणं , खोटे गुन्हा दाखल करणं , त्यांच्या बद्दल खोटे नाटे अफवा फैलावुन बदनाम करणं .तो मित्र किंवा व्यक्ती आपल्या मेहनतीच्या, कष्टाच्या , हुशारीवर मोठा होत असतो म्हणून त्याची निंदा नालस्ती पाठीमागे करणं हा ईस्लाम मध्ये सर्वात मोठा गुन्हा समजला जातो. मुलींच्या , स्त्रीयांवर, नाहक काही तरी आळ घालणं हा ही सर्वात मोठा गुन्हा ठरतो याला तोहमत लागणा सबसे बडा गुन्हा सगिराह ( माफ न करण्यासारखा )मानला जातो. , वादा खिलापी करणं , खोटं बोलणं ,असे असंख्य प्रकारचे गुन्हे करणं. आणि त्या सर्वांची माफी मागतो तो '' तौबा '' करतो .

दिव्य कुरआन मधील नववा (९) वा सुराहा '' तौबा ''प्रेषित हजरत मुहम्मद सल्लम.च्या मदीनां काळातील अखेरच्या टप्प्यात '' तबुक'' युध्दाच्या प्रथम ,तबुक युद्धामध्ये व शेवटी अवतरीत झाली आहे, तबुकचे रहिवासी प्रेषित मुहम्मद स्व सल्लम यांना वारंवार त्रास देत ,कधी कधी तर त्यांनी सुलहा करुन पुन्हा तो तोडीत म्हणजेच वादा खिलापी करणं चालुच होतं , प्रेषित मुहम्मद स्व सल्लम त्यांना वारंवार माफी क्षमा देत ..

दिव्य कुरआन मध्ये जवळजवळ सत्तर (७०) वेळा '' तौबा' चं म्हणजेच तुम्ही झालेल्या पापांची अल्लाह रब्बुल आलमीन जवळ '' माफी'' तौबा चे शब्द आलेले आहेत.


प्रेषित मुहम्मद स्व . सांगतात, '' जो व्यक्ती अल्लाह च्या थोड्याशा रोजी देत असेल तर जो व्यक्ती त्या थोड्याशा रोजी वर ही समाधानी ( खुश ) आनंदी, असेल, तर अल्लाह खुश होऊन त्याने मागितलेल्या थोड्याशा'' तौबा'' वय खुश होउन माफ करतात. '' (हादीस बैहकी ४४०९ अन् अलि रजि).

यावरुन प्रेषित मुहम्मद स्व सल्लम सांगतात, '' अल्लाह ( ईश्वरा) ने दाखविलेल्या सरळ मार्गावर चालत तुम्हाला किती ही त्रास झाला तर तो त्रास सहन करत त्यावर शांत राहा, . सुरुवातीला तुम्हाला तो असह्य होईल , दुःख,यातना भोगव्या लागतील शेवटी येथ पर्यंत की त्रासांचे काटे तुम्हाला बोचतील परंतु तुम्ही शांत राहा, त्या त्रासाच्या बदल्यात तुमची सर्व पापं माफ होतील '' ( हादीस अल - बुखारी शरीफ न.५६४१ ).

सर्व पापं माफ करणारे ,तौबा( माफी )कबुल करणारं अल्लाहच आहेत, वारंवार -सतत - वारंवार तौबा करत चला . अल्लाह चे असंख्य - अनंत नावे आहेत ,उदा.या रहमान, या रहीम , या कुद्दसू, या मालिकू , या अझाझु, या सत्तारू , या गफफारु , या जब्बारू , या कहहारु, या रज्जाकू असंख्य विशेष अनेक अनंत नावं विशेषनं वापरण्यात आलेली आहेत , असं कोणतेही नावे घेऊन , मी खुप गुन्हे केलेले आहे, मी फार मोठ्ठा गुन्हेगार आहे, मी फार मोठ्ठा खताकार आहे, मी फार मोठ्ठा मुजरीम आहे, शेवटी मी जो काही गुन्हा केलेला असेल तो माफ - क्षमा कर. तु अल्लाह फार मोठा व तु अनंत आहे , तु प्रथम व शेवट आहे , तु तर माफी तौबाला मागणाऱ्यानां पसंद करत असतो . आम्ही वारंवार गुन्हा करुन वारंवार तुझ्या कडे माफी -.माफी- तौबा करतो तर तु माफ करून तौबा कबुल करतो हे आम्हाला पक्कं ठाऊक आहे , आम्हाला नक्कीच माहित आहेत विश्वास आहेत की आमची याचना -तौबा - माफी - कबुल करणारा आहेत तर आम्हाला जरूर माफ कर ..व्याकूळ होऊन पुन्हा - पुन्हा साकडं घालून तौबा माफी क्षमा मागण्याची असते..

सध्या पवित्र रमजान मुबारक महिन्याची पवित्र रात्र लैलातुल कद्र ची हजारो महिन्यांच्या रात्रीं पेक्षाहीं मोठी फक्त्त एकच रात्रं आहेत म्हणजेच एका रात्रीत कमवलेलं पुण्य सबाब हें हजारो महिन्यांच्या पटीने असतं..

तौबा कबुल करण्याचा पर्व आहे...ऑफर आहेत बोननझा पेक्षा हीं अतिभव्य दिव्य ऑफर संधी..प्रख्यात गायक नुसरत फतेह अली खाँ तौबा कबुल होण्याच्या भरोशाने आपल्या कव्वालीमध्ये म्हणतात की, '' तु माफ करेंगां मेरे सारें गुनाह...मेरी तौबा..मेरी. तौबा...''..



डॉ. सलीम शेख
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## शिरेगावात पंचदिनी ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**सोनई** : श्रीराम नवमी उत्सवानिमित्त नेवासा तालुक्यातील शिरेगाव-पानेगाव (रामपूर) येथील श्रीराम मंदिर प्रांगणात २२ ते २७ मार्च दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवर्य महंत भास्करगिरी महाराज, हभप रघुनाथ महाराज खेडलेझुगे यांच्या आशीर्वादाने तसेच हभप भगवानजी जगले महाराज शास्त्री व हभप पुंडलिक महाराज तुवर यांच्या प्रेरणेने हा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती भागवताचार्य हभप गीताराम महाराज तुवर यांनी दिली. या कालावधीत दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७.३० ते १२ ज्ञानेश्वरी पारायण वाचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, ६ ते ६.३० हनुमान चालीसा व रामरक्षा स्तोत्र तसेच रात्री ७ ते ९ कीर्तन सेवा होणार आहे. कीर्तन सेवेत हभप भगवान जगले महाराज, निलेश महाराज रोडे, कार्तिक महाराज गडदे, अनिकेत महाराज मोरे, रुद्राक्ष महाराज तुवर व गीताराम महाराज तुवर सहभागी होणार आहेत. २७ मार्च रोजी हभप विनोद महाराज भालके यांच्या काल्याच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सावरगावच्या विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन स्पर्धेत यश




**संगमनेर** : श्री दामोदर मालपाणी मेमोरियल ट्रस्ट, संस्कृत संवर्धन मंडळ व महाविद्यालय शाळा समूह योजना, संगमनेर केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत, मराठी व इंग्रजी विषयांच्या विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये प्रवरा माध्यमिक विद्यालय, सावरगाव तळ येथील १५ विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. संस्कृत काव्यगायन स्पर्धेत ज्ञानेश्वरी गणेश नेहे हिने पंचम क्रमांक मिळविला, तर ईश्वरी राजेंद्र गाडे हिला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. तसेच इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत (इयत्ता पाचवी-सहावी गट) नियोजित वक्तृत्व प्रकारात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी कु. ईश्वरी भरत शेटे हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुस्तके देऊन सन्मानित करण्यात आले. ईश्वरी सतीश नेहे (इयत्ता पाचवी) हिने १०० पैकी १०० गुण मिळवत गोल्ड मेडल पटकावले. देवीजा राहुल नेहे हिने ९७ गुणांसह सिल्वर मेडल मिळविले. ऋतिका बाबासाहेब नेहे हिने ९६ गुणांसह ब्रॉंझ मेडल मिळवून यश संपादन केले. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक विशाल निचळ यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी व सहभागी विद्यार्थ्यांचे प्रवरा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व पदाध विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, स्कूल कमिटी तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## संगमनेरच्या आरोग्य समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधले

**संगमनेर** : मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संगमनेर मतदारसंघातील आरोग्यविषयक समस्यांकडे आमदार अमोल खताळ यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. मतदारसंघातील रुग्णालयांमध्ये आवश्यक वैद्यकीय उपकरणांचा अभाव, औषधांचा अपुरा पुरवठा तसेच डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर रिक्त जागांमुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी येत असल्याचे त्यांनी नमूद केले. संगमनेर मतदारसंघ भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असल्याने नागरिकांना आरोग्य सेवांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे खताळ यांनी सांगितले.

अनेकदा गंभीर रुग्णांना उपचारासाठी दूरच्या शहरांमध्ये जावे लागते, ही चिंताजनक बाब असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. रुग्णालयांमध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणे, औषधांचा पुरेसा साठा तसेच प्रशिक्षित डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यावर शासनाने विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, संगमनेर येथे नर्सिंग कॉलेज सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून त्यास तातडीने मंजुरी देण्याची मागणीही आमदार खताळ यांनी सभागृहात केली.

# एकविरा महिला क्रिकेट चषक जिजाऊ ब्रिगेडने पटकावला

### रस्सीखेच मध्ये सावित्रीच्या लेकी प्रथम । ५२६० महिलांच्या सहभागातील क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : महिलांच्या आरोग्याबरोबरच कला व क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून झालेल्या एकविरा क्रीडा महोत्सव २०२६ मध्ये ५२६० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला असून क्रिकेट मधील अंतिम सामन्यात जिजाऊ ब्रिगेड संगमनेरने हिरकणी वडगाव पान संघाचा पराभव करत विजेतेपद पटकावले तर रस्सीखेच मध्ये सावित्रीच्या लेकी संघाने विजेतेपद पटकावले. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने एकविरा फाउंडेशनच्या वतीने क्रिकेट रस्सीखेच व बॅडमिंटन स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत क्रिकेटमध्ये १६० रस्सीखेच मध्ये २५२ तर बॅडमिंटन मध्ये ३२७ संघांनी सहभाग घेतला.







सात दिवस सुरू असलेल्या या क्रीडा महोत्सवात तालुक्यातील ५२६० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या स्पर्धेचा पारितोषण वितरण समारंभ अत्यंत दिमाखदार पद्धतीने संपन्न झाला. याप्रसंगी डॉ.जयश्रीताई थोरात, पांडुरंग पा.घुले, सौ.रचनाताई मालपाणी,ड. नानासाहेब शिंदे,रामहरी कातोरे, नवनाथ आरगडे, अंकुश ताजने,डॉ.हर्षवर्धन गुंजाळ,अभयसिंह जोंधळे,ओम मयूर, नगरसेविका डॉ.अनुराधा सातपुते, सरोजना पगडाल, अर्चना दिघे, गणेश गुंजाळ, यांच्यासह विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. या महिला क्रिकेट स्पर्धेत खुल्या गटातून संगमनेर येथील जिजाऊ ब्रिगेडने अंतिम सामन्यात हिरकणी वडगाव पान संघावर १४ धावांनी मात केली व ११ हजार रुपये आणि मानाचा चषक पटकावला, द्वितीय संघाला ७००० रुपये व ट्रॉफी तर वीरांगाना पिंपळगाव माथा या संघाला तृतीय क्रमांक ५००० रुपये बक्षीस आणि ट्रॉफी देण्यात आली.

महाविद्यालयीन गटामधून सह्याद्री जुनियर कॉलेजने प्रथम क्रमांक मिळवला तर अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजला द्वितीय क्रमांक मिळाला. आणि सह्याद्री सीनियर कॉलेजला तृतीय क्रमांक मिळाला. तर शालेय गटामधून श्री श्री रविशंकर विद्यामंदिराने सलग चौथ्या वर्षी प्रथम क्रमांक मिळवला. तर सह्याद्री विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला. चंदनेश्वर विद्यालय चंदनपुरीला तृतीय क्रमांक मिळाला. रस्सीखेच मध्ये महिला खुल्या गटातून सावित्रीच्या लेकी संगमनेर यांनी प्रथम क्रमांक, वडगाव पाण हिरकणी द्वितीय क्रमांक व घे भरारी घुलेवाडी तृतीय क्रमांक मिळवला. महाविद्यालयीन गटामधून अमृतेश्वर माध्यमिक विद्यालय संगमनेर खुर्दने प्रथम क्रमांक मिळवला, सह्याद्री जुनियर कॉलेजने द्वितीय क्रमांक व सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात थोरात वरिष्ठ महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळवला.शालेय गटामधून चंदनेश्वर विद्यालय चंदनापुरी यांनी प्रथम क्रमांक सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात विद्याभवन यांनी द्वितीय क्रमांक व शुक्लेश्वर विद्यालय सुकेवाडी यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

प्रथम विजेत्यांना ११००० रुपये रोख व ट्रॉफी द्वितीय क्रमांक विजेत्यांना ७००० रुपये रोख व ट्रॉफी व तृतीय क्रमांक विजेत्यांना पाच हजार रुपये रोख व ट्रॉफी बक्षीस देण्यात आली. याचबरोबर व्यक्तिगत बक्षीसही अनेक महिलांना देण्यात आली. यावेळी बोलताना डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाले की, महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एकविरा फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांसाठी आरोग्य,शिक्षण, संतुलित आहार, व्यायाम याबाबत विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या क्रीडा महोत्सवातून तालुक्यातील प्रत्येक गावांमधून महिला मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या. सात दिवसांमध्ये अत्यंत आनंदाचे वातावरण होते. एकमेकींच्या भेटी होणे.

मैत्री वाढणे याचबरोबर आरोग्य आणि आहाराबाबत चर्चा होणे ही आनंदाची बाब आहे. या क्रीडा महोत्सवात अगदी ७ वर्षाच्या मुलीपासून ७२ वर्षाच्या आजी पर्यंत सर्वांनी सहभाग घेतला. अत्यंत आनंदाने आणि खेळीमेळीने झालेल्या या स्पर्धा नक्कीच ऊर्जा देणाऱ्या आहेत. याचबरोबर ताण - तणाव धावपळीचे जीवन असंतुलित आहार यामुळे कॅन्सरचे वाढते प्रमाण चिंताजनक असून ३० वर्षा पुढील सर्व महिलांनी गर्भाशयाच्या कॅन्सरची तपासणी करून घ्यावी. पहिल्या व दुसऱ्या स्टेज मधील कॅन्सर आढळल्यास तो पूर्णपणे बरा करता येतो. कॅन्सरवर आपण मात करू शकतो त्याला घाबरण्याची कारण नाही असे सांगताना स्वस्त रहा मस्त रहा जबरदस्त रहा हा आरोग्यदायी सल्ला त्यांनी दिला. यावेळी सर्व खेळांमधील खेळाडू महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आंतरराष्ट्रीय पारितोषिक वितरणाच्या धरतीवर, फटाक्यांची आतिषबाजी,जल्लोष, डीजे आणि विद्युत रोषणाईत झालेला हा सोहळा सर्वांसाठी संस्मरणीय होता. या कार्यक्रमाचे आयोजनासाठी एकविरा फाउंडेशनच्या सर्व महिला व युवती कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## त्रिमूर्तीच्या गौरी मुखेकरची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत दमदार झेप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**नेवासा** : नेवासा फाटा परिसरातील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, त्रिमूर्तीनगर येथील विद्यार्थीनी व कुस्तीपटू द्वितीय वर्ष कला शाखेतील गौरी कानिफनाथ मुखेकर हिची दि. १७ ते २० मार्च २०२६ दरम्यान होणाऱ्या ऑल इंडिया कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र येथे होणार असून तिची निवड सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने करण्यात आली आहे. गौरी मुखेकर हिने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर नेवासा तालुक्याचे तसेच त्रिमूर्ती महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

तिच्या या यशामध्ये त्रिमूर्ती कुस्ती केंद्र अॅकॅडमीचे प्रशिक्षक संभाजी निकाळजे तसेच त्रिमूर्ती सीनियर कॉलेजचे फिजिकल डायरेक्टर नितीन चिरमाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.या यशाबद्दल त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड. सुमतीताई घाडगे पाटील, उपाध्यक्षा ड. स्नेहलदीदी चव्हाण घाडगेपाटील, सचिव मनीष घाडगे पाटील, सहसचिव डॉ. श्रुती आमले घाडगेपाटील, विश्वस्त चेतन चव्हाण पाटील, सीनियर कॉलेजच्या समन्वयक डॉ. अनुराधा गोरे, त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे, उपप्राचार्य प्रा. निकिता बर्गे , प्रा.संतोष जावळे, साईनाथ भवर, सोमनाथ खेडकर, नितीन चिरमाडे, अक्षय देवतरसे, राहुल बोरुडे, प्रवीण आवारे, गोरख गुंड, मंगेश वैरागरे, अनिकेत आरसुळे, पल्हारे, अभिषेक दरंदले, तसेच प्राध्यापिका योगिता गायकवाड, रीमा कराडे, भाग्यश्री कोल्हे, नूतन वंजारे, गायत्री ढाकीफळे, अमृता देवकर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच माध्यमिक महाविद्यालयाचे प्राचार्य सोपान काळे, ढझड चे प्राचार्य अरविंद देशमुख, ढखड च्या प्राचार्या श्रीदेवी नायर, त्रिमूर्ती क्रीडा समन्वयक संजय सिंग चव्हाण (सैनिकी मेजर) यांनीही तिचे अभिनंदन केले.

त्रिमूर्ती संकुलामध्ये आर्चरी, रायफल शूटिंग, कुस्ती, कबड्डी, किक बॉक्सिंग, व्हॉलीबॉल, फुटबॉल, अथलेक्टिक्स आणि क्रिकेट या विविध क्रीडा प्रकारांसाठी उत्तम प्रशिक्षण दिले जाते. गौरीला प्रशिक्षक अभिजीत दळवी, छबुराव काळे, संभाजी निकाळजे, महादेव काकडे, अशोक पानकडे, नितीन चिरमाडे, साहेबराव गाणे, मुकेश जाधव, गणेश शिंदे, निलेश पैठणे, राहुल शेळके, शैलेश दाणे, गौरव दाणे, समीर शेख (सैनिकी प्रशिक्षक) यांचे मार्गदर्शन लाभले आहे.गौरी मुखेकर हिच्या या निवडीमुळे नेवासा तालुक्यासह त्रिमूर्ती संकुलाच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## डॉ. निखिल उगले यांचे राज्यस्तरीय जलतरण स्पर्धे मध्ये यश




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : पाचेगाव तालुका नेवासा येथील वैद्यकीय सेवेतील प्रथितयश यश डॉ. निखिल उगले यांनी राज्यस्तरीय एक किलोमीटर जलतरण स्पर्धेमध्ये यश संपादन केले असून सदर स्पर्धा दि. १५ मार्च २०२६ रोजी नाशिक ओपन वॉटर असोसिएशन यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा वालदेवी डॅम नाशिक येथे आयोजित केल्या होत्या.त्यामध्ये डॉ. निखिल उगले यांनी नगर जिल्ह्याचं नेतृत्व करून एक किलोमीटर जलतरण स्पर्धा ही २८ मिनिट व २२ सेकंद मध्ये पूर्ण करून महाराष्ट्रात तिसरा क्रमांक पटकावला. यासाठी त्यांच्या मातोश्री सिंधू सुधाकर उगले व पत्नी तन्वी उगले तसेच आजोबा डॉक्टर रामनाथ उगले चुलते दिलीप उगले व सासरे विठ्ठलराव गुंजाळ ,मामा कारभमित्रपरिवारव परिवर्तन पॅनल पाचेगाव, त्यांचा मित्रपरिवार यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांचे या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## पापमोचनी एकादशी निमित्त 'पैस' खांबाचे दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : फाल्गुन वद्य पापमोचनी एकादशी निमित्त नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज 'पैस' खांब मंदिरात हजारो भाविकांनी माऊलींच्या मूर्तीमंत रूप मानल्या जाणाऱ्या 'पैस' खांबाचे दर्शन घेतले. यावेळी विविध भागांतून आलेल्या शेकडो दिंड्यांनी ज्ञानोबा माऊली तुकारामच्या गजरात मंदिरात हजेरी लावली. एकादशीच्या निमित्ताने पहाटे संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत 'पैस' खांबास अभिषेक करण्यात आला. त्यानंतर नेवासा तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. किशोर गळनिंबकर, डॉ. शंकरराव शिंदे, स्त्रीरोग तज्ञ डॉ. मनिषा वाघ, डॉ. निर्मला सांगळे, डॉ. संदीप देशमुख, डॉ. गणेश नांदे, डॉ. निलेश लोखंडे व डॉ. वरुणराज देवरे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

उपस्थित डॉक्टरांचा देवस्थानतर्फे श्रीफळ व प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला. गंगापूर तालुक्यातील नागापूर व शेंदूरवादा येथील भजनी मंडळांनी सकाळी भजन सेवा केली, तर दुपारच्या सत्रात अंमळनेर-खुपटी भजनी मंडळाने भजन सादर केले. करजगाव व शिरगाव येथील सेवेकऱ्यांनी मंदिरात सेवा दिली. यावेळी मध्यमेश्वर मंदिर देवस्थानचे प्रमुख बालयोगी महंत श्री ऋषिनाथजी महाराज, माजी सभापती रावसाहेब कांगुणे, वैभव निकम, युवा उद्योजक शिवाभाऊ पाठक तसेच इतर मान्यवरांनी माऊलींच्या 'पैस' खांबाचे दर्शन घेतले. एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर परिसरात मोठी गर्दी झाली होती. मंदिर परिसरात विविध दुकाने उभारण्यात आल्याने यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यावेळी वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांचे कीर्तन झाले. कीर्तनानंतर विलास नांगरे परिवाराच्या वतीने भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले.

**जाहिर नोटीस**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय श्रीरामपूर मी शांताबाई निवृत्ती डुकरे व ७९ रा. पेमगिरी, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर, शपथ पूर्वक लिहून देते की, माझे पती निवृत्ती शंकर डुंबरे यांच्या नावावर असलेला ट्रॅक्टर क्रमांक MH.17.CX.2595 आहे परंतु २२/११/२०२५ रोजी मयत झाले. तरी वारसा हक्काप्रमाणे माझ्या मालकीचा व माझ्या नावावर करण्यात यावा.

Rashtrasant Janardan Swami Foundation's
**RASHTRASANT JANARDHAN SWAMI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE & RESEARCH CENTRE,**
Address: - Mumbai – Nagpur Highway, Kokamthan,
Tal. Kopargaon, Dist. Ahemdnagar-423 601
E-mail: - rajaswahomoeopathic@gmail.comWebsite: - www.rjsgi.com
Contact: 9371679000
(Affiliated to Maharashtra University Health Sciences, Nashik)

**Wanted**

**ANNEXURE – 'B'**

Applications are invited for filling up the following posts in the above said College/Institute.

| Sr. No | Type Of Pots | Vacant Posts | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal/Director | Filled | | |
| Sr. No | Subject | Vacant Posts | | |
| | | Professor | Associate Professor/ Reader | Assistant Professor/ Lecturer |
| 1 | Anatomy | Filled | Filled | 1-(Open) |
| 2 | Physiology | 1-(Open) | 1-(Open) | 1-(Open) |
| 3 | Organon of Medicine | Filled | 1-(Open) | 1-(Open) |
| 4 | Homoeopathic Pharmacy | - | Filled | Filled |
| 5 | Homoeopathic Materia Medica | 1-(Open) | Filled | 1-(Open), 1(ST) |
| 6 | Pathology & Microbiology | 1-(Open) | Filled | 1-(Open) |
| 7 | Forensic Medicine & Toxicology | - | Filled | 1-(Open) |
| 8 | Practice of medicine | Filled | Filled | Filled |
| 9 | Surgery | Filled | Filled | 1-(Open) |
| 10 | OBGY | 1-(Open) | 1-(Open) | 1-(Open) |
| 11 | Community Medicine | Filled | Filled | 1-(Open) |
| 12 | Repertory | Filled | Filled | Filled |

**Note:-**
**1**. Last date of application is 30/03/2026 **2**. Date and time of interview will be informed to the candidate **3**. Candidate applying for reserve category post(s) should submit cast certificate & cast validity certificate and also recent non-creamy layer certificate, wherever applicable **4**. The decision taken by MUHS authorities regarding essential qualifications and experience shall be applicable, from time to time **5**. Pay scale is as per rules **6**. Rules applicable as per NCH & MUHS Nashik.

Apply to the secretary, Rashtrasant Janardhan Swami Homoeopathic Medical College and Research Centre, Kokamthan, Kopargaon in prescribed format along with self-attested copies of all relevant documents.

**Sd/- Secretary**
**Rashtrasant Janardhan Swami Homoeopathic Medical College & Research Centre**

# बेलापूरात महाराजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : सर्वसामान्य नागरिकांच्या महसूल विषयक प्रलंबित अडचणी तात्काळ सोडवण्यासाठी आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर शनिवारी (दि. १४) बेलापूर येथे उत्साहात पार पडले. या शिबिरात शेकडो लाभार्थ्यांच्या विविध कामांचा जागेवर निपटारा करण्यात आला. विविध दाखले, आदेश आणि डिजिटल कागदपत्रांचे तात्काळ वाटप झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.




प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात महसूल विभागाच्या अनेक सेवांचा लाभ नागरिकांना एका ठिकाणी उपलब्ध करून देत प्रशासनाने त्यांच्या अडचणी तत्काळ मार्गी लावल्या. शिबिरादरम्यान फेरफार नोंदींची ९५ प्रकरणे, सात-बारा दुरुस्तीच्या ६ अर्जांवर कार्यवाही करण्यात आली. याशिवाय २६८ डिजिटल सात-बारा व आठ-अ कागदपत्रांचे वितरण, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत १५ लाभार्थ्यांना आदेश, १४८ उत्पन्न आणि ७६ रहिवासी दाखले, एक खिडकी योजनेअंतर्गत ३०४ विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

> सामान्य नागरिकांची महसूल विषयक कामे विनाविलंब आणि पारदर्शक पद्धतीने मार्गी लागावीत, हा महसूल समाधान शिबिराचा मुख्य उद्देश आहे. बेलापूर येथे नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा प्रशासनावर असलेल्या विश्वासाचा द्योतक आहे. अशा शिबिरांमुळे लोकांची प्रलंबित कामे जागेवरच पूर्ण होऊन त्यांना दिलासा मिळतो.
> **किरण सावंत पाटील, प्रांताधिकारी, श्रीरामपूर**
>
> नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा एका ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले. अनेक प्रलंबित अर्जांवर तात्काळ कार्यवाही करून दाखले आणि आदेश जागेवरच देण्याचा प्रयत्न करण्यात आला. पुढेही अशा उपक्रमांद्वारे नागरिकांना अधिकाधिक सुविधा देण्यावर भर राहील.
> **मिलिंदकुमार वाघ, तहसीलदार, श्रीरामपूर**

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, मंडलाधिकारी विठ्ठल गवारी तसेच ग्राम महसूल अधिकारी व महसूल सेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## इंजिनिअर इंद्रभान चौधरी यांना 'कोहिनूररत्न' पुरस्कार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील कनोली येथील बालाजी दूध संस्थेचे चेअरमन व लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे विश्वासू सहकारी इंजिनिअर इंद्रभान मारुती चौधरी यांना 'महाराष्ट्र कोहिनूररत्न पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. नाशिक येथील गुरु आराध्या फाउंडेशनच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला असून एकविरा फाउंडेशनच्या कार्यक्रमात त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे झालेल्या कार्यक्रमात डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या हस्ते चौधरी यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी पांडुरंग पाटील घुले, रामहरी कातोरे, ड. नानासाहेब शिंदे, सौ. रचनाताई मालपाणी, ड. ज्योतीताई मालपाणी, आयुष चौधरी, ओम चौधरी यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. इंद्रभान चौधरी यांनी सिव्हिल इंजिनिअरिंग व्यवसायाबरोबरच शेती व दूध व्यवसायातही उल्लेखनीय कार्य केले आहे. संगमनेर तालुक्यातील विविध मंदिरांच्या बांधकामामध्ये त्यांनी आधुनिक स्थापत्यकलेचा वापर करून आकर्षक रचना उभारल्या आहेत. युवकांमध्ये स्वयंरोजगाराची जाणीव निर्माण करण्यासाठी ते सातत्याने मार्गदर्शन करीत असतात.

पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया देताना चौधरी म्हणाले की, शेतकऱ्यांच्या मुलांसाठी विविध क्षेत्रांत मोठ्या संधी उपलब्ध आहेत. मोठी स्वप्ने पाहून त्यांचा पाठपुरावा केल्यास यश नक्की मिळते. मोबाईलवर वेळ वाया घालवण्यापेक्षा कौशल्य आणि ज्ञान वाढविण्यावर युवकांनी भर द्यावा. दरम्यान, या पुरस्काराबद्दल बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, दुर्गाताई तांबे, रणजितसिंह देशमुख यांच्यासह कनोली ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# पीएम आवास योजना २.० अंतर्गत ४८ घरकुलांना मंजुरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव..** कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने येत्या १६ मार्च २०२६ रोजी नगरपरिषद हद्दीतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी पत्रकांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली. अशा प्रकारे प्रधानमंत्री आवास योजनेबाबत अधिक माहिती देताना नगराध्यक्ष पराग संधान म्हणाले की, कोपरगाव नगरपरिषद हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत ४८ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले आहेत. पीएमएवाय-यूच्या ७६ व्या आणि पीएमएवाय २.० च्या ६ व्या केंद्रीय सनियंत्रण समितींच्या बैठकीत या घरकुलांना नुकतीच मंजुरी देण्यात आली. ही बैठक आवासन व शहरी कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांच्या अधिपत्याखाली पार पडली.



अशा प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांची दूरदृष्टी असणारी योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे माध्यमांतून पीएमएवाय २.० अंतर्गत शहरातील मजूर असलेल्या ५३ लाभार्थ्यांपैकी ११ लाभार्थ्यांच्या खात्यात प्रत्येकी १ लाख रुपये प्रमाणे एकूण ११ लाख रुपयांचा निधी ११ मार्च २०२६ रोजी वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील घर बांधकामासाठी आर्थिक मदत मिळाली आहे. तसेच उर्वरित लाभार्थ्यांना बांधकामाच्या प्रगतीनुसार पुढील टप्प्यातील अनुदान लवकरच देण्यात येणार आहे.

तसेच कोपरगाव नगर परिषद मध्ये प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत नाव नोंदणी सुरू आहे. स्वतः च्या मालकीची जागा आहे अशा लाभार्थ्यांना बीएलसी घटकांतर्गत नाव नोंदणी करता येईल व मंजुरीसाठी तो प्रस्ताव लवकरात लवकर शासन स्तरावर पाठवण्यात येतील असेही सांगण्यात आले आहे.त्यामुळे कोपरगाव नगरपरिषद हद्दीत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या घरांच्या बांधकामाला शासनाकडून मोठे सहकार्य मिळणार असून घरकुल उभारणीस अधिक वेग येईल, असा विश्वासही नगराध्यक्ष पराग संधान यांनी व्यक्त केला.

# मी अजूनही शरद चंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रवादीचाच कार्यकर्ता : माजी मंत्री तनपुरे




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : येथील पत्रकार परिषदेत माजी मंत्री प्राजक्त यांनी राहुरी विधानसभा पोटनिवडणुकी संदर्भात असलेली आपली भूमिका स्पष्ट केली

याप्रसंगी बोलताना तनपुरे म्हणाले की, मी राज्यमंत्री असताना राहुरी पाथर्डी नगर मतदार संघातील अनेक विकास कामे केली. आणि वर्षानुवर्ष मतदार संघातील कार्यकर्त्यांशी तनपुरे घराण्याचे भावनिक नाते आहे. मंत्री पदाच्या काळात केलेल्या विकास कामा मुळे तळागाळातील कार्यकर्त्यांशी माझा संबंध आलेला आहे. त्यामुळे मतदार संघातील कार्यकर्त्यांची भावना विचारात घेऊन त्यांच्याशी संवाद साधल्यावर निवडणुकीची भूमिका स्पष्ट करणार असल्याची माहिती राहुरी पाथर्डी नगर मतदार संघाचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी त्यांना भाजपा प्रवेशाबाबत पत्रकारांनी छेडले असता त्यांनी वरील भूमिका स्पष्ट केली.यावेळी त्यांना विकासासाठी सत्तेत असणे गरजेचे आहे का असा सवाल केला असता त्यांनी सांगितले की, सध्या सत्तेत राहूनही काही सत्तेत असलेल्या आमदारांना सुद्धा निधी मिळत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी आपल्या आमदारकीच्या काळात निळवंडे पाणीप्रश्न, वांबोरी चारीचे पाणी, तालुक्यातील विजेच्या प्रश्नावर मोठी कामे केल्याने आजही तालुक्यात शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत आहे .

निवडणुकीच्या तोंडावर होत असलेल्या चर्चेबाबत त्यांनी सांगितले की, मी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातच आहे. आणि आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, मी आणि आमच्या राजकीय वाटचालीत राहुरी पाथर्डी आणि नगर या मतदार संघातील अनेक कार्यकर्ते आमच्याशी जोडले गेले आहेत त्यामुळे ते माझ्या आमच्या कुटुंबातील सुख दुःखाशी समरस असणारे कार्यकर्ते आहेत त्यामुळे येत्या दोन दिवसात मी मतदार संघातील प्रत्येक गावात जाऊन तेथील कार्यकर्ते आणि ग्रामस्थ यांच्यात संवाद साधूनच पुढील निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले. याप्रसंगी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर, उपाध्यक्ष गजानन सातभाई, विजय तमनर व सर्व नगरसेवक पदाधिकारी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### अशोक आंबेकर

**आंबी** : राहुरी तालुक्यातील गुहा येथील जुन्या पिढीतील प्रेरणा पतसंस्थेचे माझी संचालक अशोक सोपानराव आंबेकर (वय ८२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते विलास आणि आप्पासाहेब यांचे ते वडील होत.



## कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासकाची नेमणूक करा : मनिषा व्यवहारे



**गंगापूर** : राज्यातील ज्या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपला आहे, त्या ग्रामपंचायतींवर तात्काळ प्रशासक नेमण्याची मागणी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा काटेपिंपळगावच्या माजी सरपंच मनीषा कृष्णकांत व्यवहारे यांनी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनात केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील अनेक ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपलेला असून अद्याप नवीन निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज ठप्प झाले असून नागरिकांच्या अनेक कामांचा खोळंबा होत आहे. विविध विकासकामांनाही अडथळे निर्माण होत आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८नुसार ज्या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपतो त्या ठिकाणी प्रशासक नेमणे आवश्यक असते. मात्र अनेक ठिकाणी अशी नियुक्ती न झाल्यामुळे ग्रामपंचायतीचे कामकाज विस्कळीत झाले आहे. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधित ग्रामपंचायतीमध्ये प्रशासकीय विस्तार अधिकारी किंवा सक्षम अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणी निवेदनाद्वरे करण्यात आली आहे.

ग्रामपंचायतींचे कामकाज सुरळीत सुरू राहावे व नागरिकांची कामे वेळेत व्हावीत यासाठी शासनाने तात्काळ निर्णय घेऊन आदेश जारी करावेत, अशी मागणी मनीषा व्यवहारे यांनी निवेदनाद्वरे केली आहे.

# नारायणपूर येथे जिल्हास्तरीय संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान पाहणी दौरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय पाहणी दौऱ्याअंतर्गत नारायणपूर येथे विविध विकासकामांची व स्वच्छता व्यवस्थेची उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) ओमप्रकाश रमावत यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकाऱ्यांच्या पथकाने गावातील स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन आणि इतर विकासकामांचा पाहणी करून आढावा घेतला.

यावेळी आदर्श सरपंच नाशेर पटेल, उपसरपंच मजीद शेख व ग्रामपंचायत अधिकारी स्वप्निल घरमोडे यांच्या उपस्थितीत हा पाहणी दौरा पार पडला.




या पाहणी दौऱ्यात छत्रपती संभाजीनगर येथील कार्यक्रम अधिकारी महिला व बालकल्याण विभाग मंगल पांचाळ, विस्तार अधिकारी मंगेश कुंटे गंगापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अशोक घोडके तसेच स्वच्छ भारत मिशन कक्षाचे माहिती व संवाद तज्ञ संजय वाघ यांनी सहभाग घेतला.संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या अनुषंगाने गावातील रस्ते स्वच्छता, पाणी व वीज व्यवस्था, वृक्ष लागवड, सार्वजनिक स्वच्छता, गटार व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, शौचालय वापर, प्लास्टिकमुक्ती, पिण्याच्या पाण्याची स्वच्छता तसेच गावातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता यांची तपासणी करण्यात आली.घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सुरू असलेल्या कामकाजाची माहिती इकोसत्व संस्था यांच्याकडून घेण्यात आली. कचऱ्याचे वर्गीकरण, संकलन आणि व्यवस्थापन कशा पद्धतीने केले जाते याबाबत अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती घेतली.

तसेच ग्रामपंचायत सदस्य दीपक खरात, पोलीस पाटील तय्यब शेख, लिपिक मुख्तार शेख, अनिस शेख, हमीद शेख, मोबिन शेख, इकोसत्वचे महादेव चांदगुडे, अंगणवाडी सेविका सुवर्णा खरात, इर्शाद बी. चांद, सविता धोत्रे, शाहीन शेख, आशा वर्कर शबाना शागीर, दिव्या शिरसाठ, सामाजिक कार्यकर्ते राजू शेख, शरीफ पटेल तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी युडीआयडी कार्ड अद्ययावत करा : वगवाड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : संजय गांधी निराधार अनुदान योजना प्रशासन विभागांतर्गत लाभ घेणाऱ्या गावातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांना शासनाच्या निर्देशानुसार सर्व दिव्यांग लाभार्थ्यांचे युडीआयडी कार्ड हे डी. बी. टी. प्रणालीवर अद्ययावत करणे बंधनकारक करण्यात आल्याची माहिती तहसीलदार नवनाथ वगवाड, संजय गांधी विभागाचे नायब तहसीलदार सुधाकर मोरे यांनी दिली आहे.शासनाकडून मिळणारे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी व लाभार्थ्यांची अचूक माहिती शासनाच्या नोंदवहीत उपलब्ध राहण्यासाठी ही प्रक्रिया आवश्यक आहे.त्या अनुषंगाने यासोबत दिलेल्या यादीनुसार गावातील जे दिव्यांग लाभार्थी सध्या संजय गांधीप्रशासन विभागामार्फत अनुदान घेत आहेत, त्यांनी आपले युडीआयडी कार्ड तात्काळ सादर करणे आवश्यक आहे.यासाठी सर्व संबंधित लाभार्थ्यांनी दिनांक १८ मार्च २०२६ पर्यंत आपले युडीआयडी कार्ड व इतर आवश्यक कागदपत्रांसह तहसिल कार्यालय, संजय गांधी विभाग गंगापूर येथे प्रत्यक्ष हजर राहून अथवा संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करावे. तसेच ज्यांच्याकडे अद्याप युडीआयडी कार्ड उपलब्ध नाही, अशा दिव्यांग लाभार्थ्यांनीशक्य तितक्या लवकर यूडीआयडी कार्ड काढून त्याची प्रत तहसिल कार्यालय संजय गांधी विभाग गंगापूर येथे जमा करावी. तसेच शासनाच्या नियमानुसार यासोबत दिलेल्या यादीनुसार दिव्यांग लाभार्थ्यांची माहिती डी.बी.टी. प्रणालीवर अद्ययावत करणे अत्यावश्यक असल्यामुळे ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे सर्वांसाठी बंधनकारक आहे. याबाबत यासोबत दिलेल्या यादीनुसार दिव्यांग लाभार्थ्यांनी गंभीरतेने नोंद घेण्याचे घ्यावी दिनांक १८ मार्च २०२६ पर्यंत युडीआयडी कार्ड सादर न करणाऱ्या लाभार्थ्यांचे शासनाकडून मिळणारे .

# वडगावपीर येथे यात्रेनिमित्त भव्य कुस्ती आखाडा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी** : आंबेगाव तालुक्यातील वडगावपीर येथे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या पीरसाहेब-हजरत दावल मलिक पीर दर्गा शरीफ यात्रेनिमित्त भव्य कुस्त्यांचा जंगी आखाडा आयोजित करण्यात आला. या आखाड्यात १०१ ते ११११०१ रुपयांपर्यंत पैलवानांना बक्षिसे देण्यात आली.मावळ, मुळशी, खेड, जुन्नर, शिरूर, पारनेर, भोसरी आणि संगमनेर परिसरातील नामवंत पैलवानांनी या आखाड्यात सहभाग घेतला. कुस्ती स्पर्धेत गोरक्ष सासवडे, विजय आदक, विकास आदक, विशाल आदक, दिनकर आदक, विजय राजगुडे आणि नानाभाऊ मांदळे यांनी पंच म्हणून काम पाहिले.कार्यक्रमाला विवेक वळसे पाटील, देवदत्त निकम, अरुण गिरे, आशा गवळी, अभिजीतराजे खाणविलकर, डी. रावजी (राजस्थान), विजय गायकवाड, सुनील वाडकर, सुनील होळकर, संपत बोत्रे, गजानन गुळवे, फकिरा आदक, शिवाभाई आदक, संजय पोखरकर, दिलीप पोखरकर तसेच गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, विठ्ठल परिवार, शिवछत्रपती ग्रामविकास प्रतिष्ठान, जनसेवक ॲड. अवधूत राजगुडे, तानाजी राजगुडे आणि कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आखाड्यात महिला पैलवानांनीही आपली झलक दाखवली. श्रेया होळकर आणि सिद्धी होळकर या बहिणींमधील कुस्ती विशेष आकर्षण ठरली.शेवटची कुस्ती निखिल वाघ (पहाडदरा) आणि अक्षय खंडागळे (मंचर) यांच्यात झाली. या लढतीत निखिल वाघ यांनी विजय मिळवत उपस्थित प्रेक्षकांची दाद मिळवली. ग्रामस्थांनी त्यांना उचलून आनंद व्यक्त केला. यावर्षी मानाच्या नऊ कुस्त्यांनी विशेष रंगत आणली असून अनेक कुस्त्या निकाली लागल्या.

# मॉडेल स्कुल शिंगवे शाळेचे सामाजिक अंकेक्षण पूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगवे पारगाव** : केंद्र शासनाच्या समग्रशिक्षा अभियानांतर्गत शाळांना मिळणाऱ्या विविध अनुदानाचा विनियोग आणि उपलब्ध भौतिक सुविधांचा आढावा घेण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या सामाजिक अंकेक्षणाच्या (सोशल ऑडिट) पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील शिंगवे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची दोनदिवसीय तपासणी नुकतीच पूर्ण झाली.

शिक्षण विभागामार्फत नियुक्त पथकातील विशाखा दाभाडे वर्धा आणि अस्मिता दादमल चंद्रपूर यांनी दोन दिवस शाळेला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी शाळेला प्राप्त झालेल्या निधीचा वापर नियोजित आणि पारदर्शक पद्धतीने झाला आहे का, यासंदर्भातील कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात आली.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगवे येथे सामाजिक अंकेक्षण पथकाचे स्वागतकरताना मुख्याध्यापक व शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती..

तपासणीदरम्यान वर्गखोल्यांची तसेच भौतिक सुविधांची पाहणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच 'निपुण महाराष्ट्र' आणि 'विद्यार्थी सुरक्षा' यांसारख्या उपक्रमांच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला.

मुख्याध्यापक नवनाथ सिनलकर यांनी शाळेतील उपलब्ध सुविधांची माहिती पथकास दिली. त्यानंतर पथकाने छायाचित्रे घेऊन संबंधित माहिती संग्रहीत व अपलोड केली. अंकेक्षण पूर्ण झाल्यानंतर पथकाने शालेय व्यवस्थापन समिती सदस्यांसमोर अहवालाचे वाचन केले. या वेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समीर गोरडे, उपाध्यक्ष रेखा पाबळे, मुख्याध्यापक नवनाथ सिनलकर, जालिंदर पोंदे, श्रीकृष्ण डुकरे, विलास भोर, अशोक लोखंडे, सुभाष इंदोरे, वैजयंती लोखंडे, संगीता इंदोरे,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते..

# प्रा. स्मिता देशमुख यांना 'औषधनिर्माणशास्त्र'मध्ये पीएच.डी. प्रदान

**नितीन यादव ! राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस** : येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका स्मिता मधुकर देशमुख यांना 'फार्मास्युटिकल सायन्स' या विषयात डॉक्टरेट (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे.



डॉ. स्मिता देशमुख यांनी 'क्राफटींग हर्बल ट्रीटमेंट फॉर इफेक्टीव रिलाइफ इन रिकरंट ॲफ्थस स्टोमाटायटिस' या विषयावर आपले सखोल संशोधन पूर्ण केले. वारंवार होणाऱ्या तोंडाच्या अल्सरवर (फोडांवर) प्रभावी आणि सुरक्षित आराम देणारे 'हर्बल' (नैसर्गिक) उपचार तयार करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. राजस्थानमधील' अलवार युनिव्हर्सिटी'तर्फे त्यांना हा बहुमान मिळाला आहे. या संशोधनासाठी त्यांना पुण्यातील बेल्हे येथील समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्रा. डॉ. कुलदीप रामटेके आणि सासवड महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

गेल्या १४ वर्षांपासून अध्यापन आणि औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉ. स्मिता देशमुख यांची कारकीर्द अत्यंत यशस्वी राहिली आहे. आतापर्यंत त्यांचे २२ शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाले आहेत. तसेच, त्यांच्या नावावर एक पेटंट नोंदणीकृत असून त्यांनी दोन पुस्तकांसाठी प्रकरणांचे लेखनही केले आहे. यापूर्वी त्यांनी बारामतीतील शारदानगर येथील 'स्कूल ऑफ फार्मसी' आणि पुण्यातील 'इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी' येथेही आपली सेवा दिली आहेडॉ. देशमुख यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जवाहरलाल विद्यालय, केडगाव (ता. दौंड) येथे झाले. त्यानंतर त्यांनी सासवडच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे महाविद्यालयातून बी.फार्म.सी आणि पुण्यातील शिवाजीनगर येथील 'ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी' महाविद्यालयातून एम.फार्मसी पूर्ण केले. सध्या त्या सासवडमध्ये अध्यापनासोबतच विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून समाजकार्यातही हिरीरीने सहभागी असतात.

त्यांच्या या यशाबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण, उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# शिवरी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर

## १९२२ नागरिकांना विविध योजनांचा लाभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड** :- पुरंदर तालुक्यातील शिवरी येथे तहसीलदार कार्यालय, पुरंदर यांच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान – २०२६' अंतर्गत महसूल व शासकीय सेवा देणारे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करून एकूण १९२२ नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांचे महसूल संबंधित प्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर हे समाधान शिबिर अभियान राबवले जात आहे. नागरिकांना सरकारी कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत तसेच त्यांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण व्हावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पुरंदर तालुक्यातील शिवरी व वाल्हे मंडळातील नागरिकांसाठी शिवरी येथील




महात्मा ज्योतिराव फुले विद्यालयात हे शिबिर पार पडले. या कार्यक्रमास विधानसभेचे सदस्य विजय बापू शिवतारे, तहसीलदार पुरंदर विक्रम राजपूत, गटविकास अधिकारी प्रणोती श्रीश्रीमाळ, रविंद्र फुलपगारे सहा निबंधक, नायब तहसीलदार संदीप पाटील, पंचायत समिती सभापती अमित झेंडे,उपसभापती प्रवीण जगताप, जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे, हरीभाऊ लोळे, प्राजक्ता दुर्गाडे, तसेच पंचायत समिती सदस्य माणिक निंबाळकर, स्मिता निगडे, मोनिका कांबळे आदींसह संबंधित विभागांचे अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, पोलीस पाटील आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

शिबिरादरम्यान महसूल विभागाच्या विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामध्ये प्रलंबित फेरफार ५७, ७/१२ दुरुस्तीची २९ प्रकरणे, जिवंत ७/१२ चे १२७, डिजिटल ७/१२ चे १४६, ई-वितरणाची ३५५ प्रकरणे, तुकडबंदी नियमनाची ७, जमीन वर्ग बदलाची २, भूमापनातील कमी-जास्त पत्रकाची ३ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत जात प्रमाणपत्र २७, नॉन-क्रिमिलियर प्रमाणपत्र १५, उत्पन्न दाखला ४७, रहिवास / अधिवास प्रमाणपत्र २२ अशा विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच सामाजिक योजनांमधून संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी योजना मिळून ६९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.याशिवाय शिबिरात नागरिकांसाठी ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, प्रधानमंत्री किसान योजना, तक्रार निवारण यांसारख्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामुळे नागरिकांच्या अनेक प्रलंबित प्रश्नांचे तात्काळ निराकरण झाले.यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले की, अशा समाधान शिबिरांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्या गावाजवळ मिळत असून महसूल संबंधित कामांचा वेगाने निपटारा होत आहे.


## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि .१६ मार्च २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२३ १५० ११४ | ६-० | १४५ १९० ११८

जोड ६४-३०-९८-५१-०२

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१२६ १८९ १६० | ९-५ | १४० २३० ७८०

जोड ९७-१५-०२-३६-५८

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१४६ २४३ १९२ | १-२ | १५६ १२९ ११०

जोड २३-१०-४५-७८-९२

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 444 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻


# कुकडी कालव्यात पोहताना तरुण बेपत्ता


## संतप्त महिलांची कालव्यात उडी, प्रशासनावर संताप

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : पिंपळगाव पिसा येथे कुकडी कालव्यात पोहताना एक विवाहित तरुण बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना घडली असून तीन दिवस उलटूनही शोध लागत नसल्याने नातेवाईक व ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाने वेळेत मदत न केल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

दि. १३ मार्च रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास पिंपळगाव पिसा येथील गणेश रघुनाथ जाधव (वय ३०) हा तरुण मित्रांसोबत पोहण्यासाठी गेला होता. गावाच्या हद्दीतील कुकडी कालव्यावरील हंगा जलसेतूमध्ये पोहत असताना तो अचानक बेपत्ता झाला. घटनेनंतर नातेवाईक व स्थानिकांनी दोन दिवस कालव्यात व परिसरात





शोधमोहीम राबवली, मात्र त्याचा काहीच मागोवा लागला नाही.

दरम्यान, नातेवाईकांनी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण घोरपडे यांच्याशी संपर्क साधून कालवा बंद करून शोधकार्य सुलभ करण्याची विनंती केली. मात्र, कालवा बंद करण्यासाठी मंत्रालय, मुंबई येथून परवानगी आणावी लागेल, असे सांगून कोणतीही तातडीची मदत न मिळाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

तीन दिवस उलटूनही तरुणाचा शोध लागत नसल्याने संतप्त झालेल्या काही महिलांनी कालव्यात उड्या घेतल्या. यावेळी उपस्थित नागरिक व पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत त्यांना सुरक्षित बाहेर काढले.

या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची गांभीर्याने दखल घेत अखेर कुकडी कालव्याचे पाणी विसापूर धरणाकडे वळविण्यात आले असून शोधकार्य सुरू करण्यात आले आहे. दरम्यान, कार्यकारी अभियंता प्रवीण घोरपडे यांच्या भूमिकेबाबत ग्रामस्थ व नातेवाईकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

### द•ख•ल

## रेसिडेन्शिअलच्या विद्यार्थ्यांचा भारतीय प्रशासकीय सेवेत निवडीबद्दल सत्कार



**अहिल्यानगर** : रेसिडेन्शिअल कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,अहिल्यानगर येथे णझडउ-२०२५ परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या माजी विद्यार्थी मा.बापूसाहेब रतनराव गायकवाड व मा.सिद्धार्थ लक्ष्मण तागड यांचा सत्कार संपन्न झाला. या सत्कार समारंभा प्रसंगी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,अहिल्यानगर या संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे साहेब कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.तसेच संस्थेचे सचिव ड.विश्वासराव आठरे पाटील व संस्थेच्या खजिनदार ड.दिपलक्ष्मी म्हसे मॅडम उपस्थित होते. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर या संस्थेचे आपल्यावर फार मोठे ऋण आहेत,अशी भावना श्री.बापूसाहेब गायकवाड यांनी व्यक्त केली.तसेच त्यांनी आपल्या जीवनातील संघर्षपट मनोगतातून सर्वांसमोर मांडला. जिद्द,चिकाटी व सातत्यपूर्ण परिश्रमाने कोणतीही गोष्ट साध्य करता येते.आर्थिक परिस्थिती यशाच्या आड येत नाही,असे मत त्यांनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील उच्च पदावर जावू शकतात मात्र त्यांनी कुठलाही न्यूनगंड बाळगता कामा नये, असे मत सिद्धार्थ तागड यांनी व्यक्त केले.

## २२ मार्च रोजी सकल मराठा वधू-वर परिचय मेळाव्या'चे भव्य आयोजन

**अहिल्यानगर :** येथील सकल मराठा समाजाच्या वतीने शहरात आगामी २२ मार्च रोजी भव्य मराठा 'वधू-वर आणि पालक परिचय मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील सावेडी उपनगरातील हॉटेल संजोग लॉन्स, नगर-मनमाड रोड येथे सकाळी नऊ वाजल्यापासून हा सोहळा पार पडणार आहे.

आजच्या धावपळीच्या युगात आणि बदलत्या जीवनशैलीमुळे योग्य जोडीदार मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन, समाजातील उच्चशिक्षित, नोकरदार, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य कुटुंबातील उपवर युवक-युवतींना आणि त्यांच्या पालकांना एकत्र आणण्यासाठी हे विचारपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. मेळाव्यानिमित्त राज्यभरातून आणि विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यातील सकल मराठा समाजाकडून मोठ्या प्रमाणावर नोंदणी झाली आहे.सकल मराठा समाजातील सर्व इच्छुक वधू-वर आणि त्यांच्या पालकांनी २२ मार्च रोजी होणाऱ्या या परिचय मेळाव्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीने केले आहे. अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी इच्छुक उमेदवारांनी ९६८९०४७२७० या नंबरवर संपर्क साधावा.

## खारेकर्जुने येथील चोंडी नवबौध्द दलित वस्ती रस्त्याचे काम निकृष्ट

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील खारेकर्जुने ग्रामपंचायत हद्दीतील नवबौध्द दलित वस्ती चोंडी येथे करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा आरोप राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब एकनाथ ढवळे यांनी केला आहे. हा रस्ता पूर्णपणे व्यवस्थित व दर्जेदार झाल्याशिवाय त्याचे बील अदा करू नये, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

खारेकर्जुने ग्रामपंचायत हद्दीत नवबौध्द दलित वस्ती चोंडी येथे जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे नागरिकांना अनेक वर्षांपासून मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. विशेषतः पावसाळ्यात रस्त्याच्या अभावामुळे लहान मुलांना शाळेत जाताना मोठे हाल सहन करावे लागत होते. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी ढवळे यांनी ५ जून २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन नागरिकांच्या अडचणींचे छायाचित्रांसह निवेदन सादर केले होते.

या रस्त्याच्या कामासाठी माजी आमदार स्व. अनिल राठोड तसेच आमदार स्व. शिवाजीराव कर्डिले यांनी विशेष प्रयत्न केले होते. मात्र काही शेतकऱ्यांनी वेळोवेळी अडथळे निर्माण केल्यामुळे हे काम अनेक वर्षे प्रलंबित राहिले.

## वन विभागाचा टँकरद्वारे पाणीपुरवठा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मिरजगाव :** मिरजजगाव परिसरात वाढत्या उन्हाची तीव्रता वाढल्याने वन्यप्राण्यांच्या अन्न-पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यातून मानव-वन्यप्राणी संघर्षाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर वन विभागाने वन्यप्राणी, पशू व पक्ष्यांची पाण्यासाठी होणारी भटकंती रोखण्यासाठी कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत. त्यात टँकरद्वारे पाणी सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

मिरजजगाव वन विभागाच्या हद्दीत एकूण १० ठिकाणी कृत्रिम व नैसर्गिक पाणवठ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. कोंभळी, कौडाणे,थेरगाव, चिंचोली काळदात, माळेवाडी, बिटकेवाडी (तुकाई मंदिर परिसर), या भागांत टँकरच्या माध्यमातून नियमित पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांना डोंगराळ भागात व गायरान क्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध होत असून, गावांकडे होणारी त्यांची वर्दळ कमी होण्यास मदत होत आहे.कडक उन्हाळ्यात वन्यप्राण्यांची पाण्यासाठी होणारी भटकंती थांबविण्यासाठी ही उपाययोजना प्रभावी ठरत असल्याचे मिरजगाव वनपरिक्षेत्र अधिकारी संकेत उगले यांनी सांगितले

फेब्रुवारी महिन्यापासूनच वन्यप्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या झळा तीव्र होत असताना पाण्याच्या शोधार्थ वन्यप्राणी, पशू व पक्षी सैरभैर फिरू लागतात. काही ठिकाणी नैसर्गिक जलस्रोत आटल्याने पाण्याअभावी जीवितहानीही होत असल्याची वस्तुस्थिती आहे. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन वन विभागाने १० पाणवठे नवीन करून पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले आहे,असे उगले यांनी सांगितले.

## महाराष्ट्र इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेचा निकाल जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**एरंडगाव** : विद्यालयाचा महाराष्ट्र इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेचा निकाल नुकताच लागला असून या परीक्षेत शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता ९ वीचे २३ पैकी १६ विद्यार्थी व इयत्ता १० वीचे ४३ पैकी ३९ विद्यार्थी उतीर्ण झाले .

इयत्ता ९ वी मध्ये प्रथम क्रमांक कु जगताप रितिका राजेंद्र व कु खिलारे प्रतिक्षा प्रल्हाद यांच्यात विभागून मिळाला द्वितीय कु घुले श्रावणी बाबासाहेब तृतीय कु गर्जे भक्ती हरी यांचा क्रमांक आला तर इयत्ता १० वी मध्ये प्रथम क्रमांक मरकड ओम कृष्णा, द्वितीय क्रमांक वीर तेजस श्रीहरी, तृतीय क्रमांक निळ संग्राम अशोक या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार विद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश खैरे सर, पर्यवेक्षक नांगरे सर ,सर्व स्टाफ व मान्यवरांच्या शुभ हस्ते पाल्य व पालकांचा सन्मान करण्यात आला .तसेच मार्गदर्शक शिक्षक पानकर एम बी, शिंदे एम व्ही , मोहिटे बी एम, गायकवाड सर आदींचा सन्मान प्राचार्यांच्या शुभहस्ते करण्यात आला .विद्यालयाच्या व संस्थेच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष तथा लोकनेते मारुतरावजी घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा आमदार डॉ नरेंद्र घुले पाटील , संस्थेचे सचिव तथा अहिल्यानगर मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन मा आमदार चंद्रशेखर घुले पाटील,जिल्हा परिषद अध्यक्षा मा नामदार सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले ,मा.पंचायत समिती सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन सर,समन्वयक विजय काशीद सर,विद्यालयाचे प्राचार्य डॉ रमेश खैरे सर, पर्यवेक्षक जयराम नांगरे सर सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक प्रगतीच्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या .

## पोलीस दादांवर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ?१६ मार्चला आमरण उपोषणाचा इशारा

**अहिल्यानगर** : पोलीस कर्मचारी देविदास शेंडे या 'पोलीस दादा' यांच्यावर बेकायदेशीर सावकारी तसेच शुभम शिंदे यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी अद्याप गुन्हा दाखल न करता कारवाई टाळली जात असल्याचा आरोप करत रिपब्लिकन सेनेच्या वतीने कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देविदास शेंडे यांच्या बेकायदेशीर सावकारीच्या प्रकरणात तसेच शुभम शिंदे यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतरही संबंधितांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपी मोकाट फिरत असल्याचा आरोप रिपब्लिकन सेनेने केला आहे. या प्रकरणात तातडीने गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

दरम्यान, वैशाली विशाल निमसे व विशाल मारुती निमसे यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या संदर्भातही अनेकदा जिल्हा पोलीस अधीक्षक व पोलीस उपअधीक्षक यांना भेटून निवेदने देण्यात आली होती. १६ फेब्रुवारी २०२५ रोजीही पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन कारवाईची मागणी करण्यात आली होती; मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.



## घुले पाटील कॉलेजमध्ये पालक मेळावा उत्साहात




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे,मारुतरावजी घुले पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहिल्यानगर, कला शाखा व वाणिज्य शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांची जयंती','पालक मेळावा' आणि 'जागतिक महिला दिन' हे कार्यक्रम संयुक्तपणे उत्साहात साजरे करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेविका तथा महिला व बालकल्याण समिती सदस्या सौ.आशाताई लोभाजी कातोरे उपस्थित होत्या.यावेळी मार्गदर्शन करताना सौ.कातोरे म्हणाल्या की,आजच्या धकाधकीच्या जीवनात तरुणांनी शिकलं पाहिजे आणि स्वतःला घडवलं पाहिजे.पूर्वी शिक्षण व्यवस्था अत्यंत हलाखीची असतानाही विद्यार्थ्यांनी जिद्दीने शिक्षण पूर्ण केले. मात्र आज उच्च शिक्षणासाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असतानाही विद्यार्थी शिक्षणापासून दूर जात आहेत,ही चिंतेची बाब आहे. विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधींचा फायदा घेऊन आपली प्रगती साधावी.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. पी.एन.खरड यांच्या स्वागतगीताने झाली.कला शाखा प्रमुख प्रा. एस. व्ही. मरकड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. के. आर. पिसाळ, उपप्राचार्य प्रा. पी. ए. फटांगरे, डॉ. एस. बी. दहातोंडे आणि प्रा. के. एस. कराड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. के. पंदरकर होते.या पालक मेळाव्या प्रसंगी धनंजय दांगट,अश्विनी सोनटक्के आणि शिवाजी राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सुनील काळे, बळीराम घोडके, मीना शेवाळे, महेश घोडके, मनाली पवार, राठोड, मोहम्मद शेख,सविता वाघमारे, प्रा. एन. आय. शेख, ए. एच. लहाडे, एस. ए. घालमे, डी. जी. गदादे, एस. एस. शिंदे, एस. एम. बांगर, ए. आय. शेख, डॉ. आर. ए. नेटके, श्याम वाळके, अल्तमश शेख आणि विनायक शेळके यांनी पाहिले. सूत्रसंचालन डॉ. रूपाली दळवी यांनी केले, तर प्रा. व्ही. बी. लबडे यांनी आभार मानले. 'वंदे मातरम' गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## जोशी वस्ती गावात विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : जोशी वस्ती गावात विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचे नेतृत्व लिंपणगाव केंद्राचे केंद्रीय विशेष शिक्षक रोशन घोडके यांनी केले.

या मोहिमेत अंगणवाडी सेविका मनिषा मचाले, शाळेचे मुख्याध्यापक ईश्वर गोरे तसेच लीपनगावचे माजी ग्रामपंचायत सदस्य रामभाऊ फुलमाळी यांनी सक्रिय सहभाग घेतला. यावेळी पथकाने गावात घरोघरी भेट देऊन विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती गोळा केली.

दरम्यान, पूजा बाळू फुलमाळी (वय ४ वर्षे) ही मुलगी हृदयरोगाने ग्रस्त असल्याचे निदर्शनास आले. तिच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. शासनामार्फत तिच्या उपचाराचा संपूर्ण खर्च मोफत होणार असतानाही घरच्या परिस्थितीमुळे तिचे पालक तिला दवाखान्यात नेण्यास टाळाटाळ करत होते.

यावेळी केंद्रीय विशेष शिक्षक रोशन घोडके यांनी पालकांचे समुपदेशन करून त्यांचे मतपरिवर्तन केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे संबंधित पालकांनी मुलीला पुढील उपचारासाठी दवाखान्यात नेण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या मोहिमेमुळे गावातील विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना योग्य उपचार व शैक्षणिक सुविधा मिळवून देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

### आनंदऋषिजी म.सा.यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

# कार्डियाक सेंटर रुग्णांसाठी नवसंजीवनी -संजय राका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सध्या सर्वच वयोगटांमध्ये हृदयरोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत असू न अनेक वेळा चालता-बोलता व्यक्तीचा अचानक मृत्यू होत असल्याच्या घटना वाढत आहेत. अशा परिस्थितीत तत्पर व उच्च दर्जाची सेवा देणारे आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर रुग्णांसाठी नवसंजीवनी ठरत असल्याचे प्रतिपादन संजय राका यांनी केले. वाढत्या हृदयविकाराच्या पार्श्वभूमीवर समाजाची गरज ओळखून हॉस्पिटलमार्फत सुरु असलेली उत्कृष्ट आरोग्यसेवा देशभरात नावाजली गेल्याचे त्यांनी सांगितले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल एण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त श्रीमती बिजयाबाई मोहनलालजी राका परिवाराच्या वतीने आयोजित हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संजय राका, भारती राका, चंद्रकांत राका,



अनिता राका, किरण राका, प्रितम राका, गौरव राका, सोनम राका, प्रिंकेश राका, दिव्यानी राका, अमोल राका, कोमल राका, शुभम राका, सायली राका, सौरभ राका, आदेश राका, ऐश्वर्या राका, रियान राका, मायरा राका, संतोष बोथरा, सुभाष मुनोत, महेंद्र कांकरिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. विनय छल्लाणी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा यांनी सांगितले की, दर्जेदार आणि परवडणाऱ्या दरात आरोग्यसेवा मिळत असल्यामुळे देशभरातून रुग्ण आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येत आहेत. हॉस्पिटलच्या स्थापनेच्या पहिल्या दिवसापासून सेवाभावाने रुग्णसेवा सुरू आहे. औषधांसोबतच आचार्यजींच्या आशीर्वादाची दुवा मिळत असल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळतो. हॉस्पिटलचे हार्ट सर्जरी सेंटर देशभरात नावाजले गेले असून आतापर्यंत २५ हजारांहून अधिक बायपास सर्जरी, ५० हजारांपेक्षा जास्त अँजिओप्लास्टी आणि १ लाखाहून अधिक अँजिओग्राफी यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत. याशिवाय लहान मुलांच्या ८ हजारांहून अधिक हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत. पूर्वी महाराष्ट्रात हृदय शस्त्रक्रियेची केंद्रे कमी होती आणि त्याचा खर्चही सर्वसामान्यांना परवडणारा नव्हता. त्यामुळे समाजाची गरज लक्षात घेऊन या हॉस्पिटलमध्ये कार्डियाक सेंटर उभारण्यात आले. या विभागाचे आत्मा व हृदय असलेले डॉ. वसंत कटारिया यांच्या नेतृत्वाखाली या सेंटरने देशभरात नावलौकिक मिळवला आहे, असे त्यांनी नमूद केले.

सोनम राका म्हणाल्या की, वर्षभरात विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करून आनंदऋषीजी हॉस्पिटलमार्फत गरीब व गरजू नागरिकांना उपचाराची संधी दिली जाते. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या आरोग्य मंदिरातून होत आहे. या सामाजिक कार्यात राका परिवाराला सहभागी होण्याची संधी मिळणे हे आमच्यासाठी भाग्याचे असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल यांनी सांगितले की, हॉस्पिटलमध्ये अल्पदरात सेवा देताना उपचाराच्या दर्जावर कोणतीही तडजोड केली जात नाही. रुग्णांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे सेवा देण्याचा प्रयत्न केला जातो. शस्त्रक्रियेसाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि आयातीत साधनांचा वापर केला जातो. बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजविणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी व अँजिओग्राफी यांसारख्या शस्त्रक्रिया अल्पदरात केल्या जातात. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत अनेक शस्त्रक्रिया मोफतही केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिबिरात एकूण १०८ रुग्णांची हृदयरोग तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले, तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

द • ख • ल

## पावसाच्या शक्यतेमुळे बारामतीच्या पश्चिम भागात गहू काढणीला वेग

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्याच्या पश्चिम भागात सध्या गहू काढणी व मळणीची कामे वेगात सुरू आहेत. हवामान खात्याने पावसाची शक्यता वर्तवल्यामुळे शेतकरी गहू काढणीसाठी धावपळ करताना दिसत आहेत.बारामती तालुका ऊस बागायत पट्टा म्हणून ओळखला जात असला तरी युवा शेतकऱ्यांचा कल तरकारी व हंगामी पिकांकडे वाढताना दिसत आहे. सोमेश्वरनगर परिसरातील चोपडज, होळ, वडगाव निंबाळकर, सोरटेवाडी, देऊळवाडी, करंजे, मगरवाडी, करंजेपुल, चौधरवाडी, वाणेवाडी मुरूम, निंबुत या भागातील काही शेतकरी दरवर्षी गहू पीक घेत आहेत.नोव्हेंबर महिन्यात गहू पेरणी करण्यात आली होती. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून गहू काढणीला सुरुवात झाली आहे. मजुरांची कमतरता व वेळेची बचत लक्षात घेऊन बहुतांश शेतकरी गहू मळणीसाठी मशीनचा वापर करत आहेत.यावर्षी पेरणीपासून पोषक वातावरण मिळाल्याने गहू उत्पादन चांगले होण्याची शक्यता आहे. परिसरातील अनेक शेतांमध्ये गोल्डन २३ या वाणाची लागवड करण्यात आली आहे. गहू पिकातून खर्चाच्या तुलनेत तिप्पट उत्पन्न मिळावे, अशी अपेक्षा शेतकरी नितीन शेंडकर यांनी व्यक्त केली.



## इंदापूर बाजार समितीत ७१४६ क्विंटल मका खरेदी

**इंदापूर :** राज्यात मक्यासह विविध शेतमालाच्या बाजारभावात सातत्याने घसरण होत असताना शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने सुरू केलेल्या मका हमीभाव खरेदी केंद्राला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या केंद्रावर प्रतिक्विंटल २,४०० रुपयांप्रमाणे एकूण ७,१४६ क्विंटल (१४,२९२ बॅग) मका खरेदी करण्यात आला असून, ३३२ शेतकऱ्यांना एकूण १ कोटी ७१ लाख ५० हजार ४०० रुपये इतकी रक्कम मिळणार आहे. खरीप हंगाम २०२५ साठी हे मका हमीभाव खरेदी केंद्र २६ डिसेंबर २०२५ रोजी सुरू करण्यात आले. बाजार समितीचे मार्गदर्शक तथा माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे यांच्या सूचनेनुसार हा उपक्रम राबविण्यात आला. दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांच्या माध्यमातून ही खरेदी प्रक्रिया पार पडत आहे. राज्यात शेतमालाच्या बाजारभावात घसरण होत असताना हमीभावाने मका खरेदी झाल्यामुळे इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत. बाजार समितीच्या माध्यमातून शेतमाल तारण योजना तसेच हरभरा हमीभाव खरेदी केंद्रही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.तालुक्यातील शेतकरी बांधवांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती संदीप पाटील यांनी केले आहे. यावेळी संचालक माजी आमदार यशवंत माने, उपसभापती रुपाली वाबळे, माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे, विलास माने, दत्तात्रय फडतरे, मधुकर भरणे, तुषार जाधव, मनोहर ढुके, रोहित मोहोळकर, संग्रामसिंह निंबाळकर, मंगल झगडे, आबा देवकाते, संतोष गायकवाड, अनिल बागल, दशरथ पोळ, रोनक बोरा, सुभाष दिवसे तसेच प्रभारी सचिव संतोष देवकर उपस्थित होते.

## येरवड्यात काव्य मैफल रंगली

**वाघोली, पुणे :** स्त्री महिला नागरी पतसंस्थेच्या वतीने महाराष्ट्र हाउसिंग बोर्ड, येरवडा येथे निमंत्रित कवींची काव्य मैफल आयोजित करण्यात आली. कवींनी सादर केलेल्या बहारदार कवितांना रसिक श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या काव्य मैफलीत रमेश जाधव, आशा शिंदे, बालकृष्ण बाचल, सीमा गांधी, राहुल भोसले आणि माया बंगरगी यांनी कविता सादर केल्या. संमेलनाचे आयोजन संस्थेच्या अध्यक्ष क्रांती शितोळे यांनी केले होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ बालकवी बालकृष्ण बाचल होते. सूत्रसंचालन सीमा गांधी ांनी केले तर रश्मी कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला प्रा. गोरख लोखंडे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नंदा चव्हाण यांसह मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या वतीने कवींचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. काव्य मैफलीत बालकृष्ण बाचल यांनी एकटी राहते आता आजी घरात या कवितेतून ज्येष्ठ नागरिकांची व्यथा मांडली. रमेश जाधव यांनी ग्रामीण महिलांच्या पारंपरिक बंधनांवर भाष्य करणारी कविता सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले.




# निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामामुळेठेकेदार अमर जाधव काळ्या यादीत

## झारगडवाडीत १५ लाखांच्या कामात त्रुटी; जिल्हा परिषदेकडून एक वर्षासाठी बंदी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** तालुक्यातील झारगडवाडी येथील रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम केल्याप्रकरणी संबंधित ठेकेदार अमर संजय जाधव याला पुणे जिल्हा परिषद प्रशासनाने मोठा दणका दिला आहे. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार पुणे जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांनी ठेकेदार अमर जाधव यांची एजन्सी एक वर्षासाठी काळ्या यादीत टाकत जिल्हा परिषदेच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास एक वर्षाची बंदी घातली आहे. त्यामुळे निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांना प्रशासनाकडून स्पष्ट इशारा मिळाला आहे.

झारगडवाडी (ता. बारामती) येथे सन २०२२-२३ मध्ये नागरी सुविधा योजनेतून मंजूर झालेल्या सुमारे १५ लाख रुपयांच्या रस्त्याचे काम ठेकेदार अमर संजय जाधव यांना देण्यात आले होते. या कामाची पूर्तता २२ सप्टेंबर २०२२ रोजी करण्यात आली असून त्याचे बिलही अदा करण्यात आले होते. मात्र, काही दिवसांतच रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे समोर आले.




याबाबत सामाजिक कार्यकर्ते युवराज पोटे यांनी झारगडवाडी ग्रामपंचायत तसेच पंचायत समितीच्या बांधकाम विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर ग्रामपंचायतीने संबंधित ठेकेदाराला रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत सूचना दिल्या. बांधकाम उपविभागामार्फतही दोन वेळा स्मरणपत्रे देण्यात आली; मात्र ठेकेदाराने त्याकडे दुर्लक्ष केले.

यानंतर ग्रामपंचायतीने ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याबाबतचा प्रस्ताव उपविभागाकडे पाठविला. उपविभागामार्फत रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असता रस्त्याचा पृष्ठभाग निकृष्ट व खराब झाल्याचे आढळून आले. यानंतर उपअभियंत्यांनी ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची शिफारस केली.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७ प्र.क्र. ८/इमा-२ (दि. २९ जानेवारी २०१९) मधील तरतुदीनुसार पुणे जिल्हा परिषदेच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास संबंधित ठेकेदारास आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षासाठी प्रतिबंध घालण्यात आला आहे.या कारवाईमुळे जिल्ह्यातील निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारांना प्रशासनाकडून कठोर संदेश मिळाल्याची चर्चा होत आहे.

"शहर व ग्रामीण भागात ठेकेदार जास्त पैसे मिळण्याच्या हव्यासापोटी अंतर्गत रस्त्यांची निकृष्ट कामे करतात. ठेकेदार काम करत असताना संबंधित अधिकाऱ्याने देखील लक्ष देणे गरजेचे आहे मात्र अधिकारी देखील याला तेवढेच जबाबदार असतात. बारामती तालुक्यातील झारगडवाडी गावातील अंतर्गत रस्ता निकृष्ट दर्जाचा केल्याचे समोर आले होते.याबाबत ठेकेदाराला रस्ता दुरुस्त करण्याच्या नोटिसादेखील देण्यात आल्या मात्र या नोटिशीला ठेकेदाराने केराची टोपली दाखवली होती यामुळे त्या ठेकेदाराच्या विरोधात कारवाई करण्यासाठी पाठपुरावा केला अखेर १० मार्च २०२६ ला अमर जाधव या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. त्याला एक वर्षासाठी प्रतिबंध करण्यात आले आहे .मात्र रस्ता दुरुस्तीचे सर्व निकष जोपर्यंत पूर्ण करत नाही तोपर्यंत माझा पाठपुरावा सुरूच राहील.

**युवराज पोटे ( सामाजिक कार्यकर्ते )**

## रुईमध्ये स्वच्छता अभियान :,परिसर झाला चकाचक

### संपदा चौधर यांच्या पुढाकारातून दिला संदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाहिलेले स्वच्छ व सुंदर बारामतीचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने रुई (ता. बारामती) येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. बारामती नगर परिषदेच्या नगरसेविका तथा उपगटनेते संपदा चौधर, प्रा.अजिनाथ चौधर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून संपूर्ण रुई परिसर चकाचक करण्यात आला.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अभिवादन करून या अभियानाचा प्रारंभ केला गेला. अजित पवार यांना स्वच्छतेची कमालीची आवड होती, त्याच भावनेतून नगराध्यक्ष सचिन सातव, आरोग्य समिती सभापती नवनाथ बल्लाळ यांच्या विशेष प्रयत्नातून हे अभियान हाती घेण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार, युवा नेते जय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती स्वच्छ व सुंदर राहावी या साठी प्रयत्न केला जाणार आहे.

"दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्वच्छ व सुंदर बारामतीच्या संकल्पनेला प्रेरणा मानत हा उपक्रम आयोजित करण्यात आला. ग्रामस्थ, युवक मंडळे, महिला बचत गट तसेच विविध सामाजिक संस्थांच्या सहभागातून गावातील रस्ते, चौक, नाले आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसर चकाचक केला. या अभियानातून स्वच्छतेबाबत जनजागृतीही करण्यात आली."

**संपदा चौधर**
**(नगरसेविका तथा उपगटनेते बा.न.प)**




या स्वच्छता अभियानांतर्गत गावातील मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर, नाले तसेच चौकांची स्वच्छता करण्यात आली. ग्रामस्थ, युवक मंडळांचे कार्यकर्ते, महिला बचत गट तसेच विविध सामाजिक संस्थांचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी एकत्रितपणे कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावली तसेच प्लास्टिक कचरा वेगळा संकलित करण्यात आला.स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून ती प्रत्येक नागरिकाची सवय झाली पाहिजे, असा संदेश या अभियानातून देण्यात आला. स्वच्छतेमुळे गावाचे सौंदर्य वाढतेच, शिवाय नागरिकांचे आरोग्यही चांगले राहण्यास मदत होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या उपक्रमामुळे रुई गावात स्वच्छतेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले .

## शेतकरी महिलांच्या जमिनीच्या अधिकारासाठी शासन कटिबद्ध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महिलांच्या नावाने घर देणे तसेच आदिवासी जमिनीचे पट्टे पती-पत्नी दोघांच्या नावाने करण्याचा मुद्दा विधानभवनात उपस्थित करण्यात आला असून याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे सरकारने आश्वासन दिले आहे. एकटी पत्नी असल्यास तिच्या नावाने जमीन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यासंदर्भात महिलांनी आणखी कोणते मुद्दे मांडावेत, याबाबत आपली मते मांडावीत, असे आवाहन महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.महिला दिनानिमित्त संतुलन संस्था महाराष्ट्रतर्फे वाघोली येथे शनिवारी (ता. १४) २८ वी 'भव्य कष्टकरी शेतकरी महिला परिषद' आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गोऱ्हे उपस्थित होत्या. यावेळी संतुलन संस्थेच्या अध्यक्षा वंदना भुजबळ, परिषद अध्यक्षा ॲड. पल्लवी रेगे, एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष सुभाष वारे, नगरसेवक रामदास दाभाडे, शैलेंद्र बनसोडे, हेमंत बत्ते, पुणे बार असोसिएशनच्या उपाध्यक्ष प्रीती परदेशी, ॲड. अंजली बांदल, रिंकू मोरे, अनिता परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात 'आपला विकास आपल्या हाती' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, महिलांची सामाजिक सक्षमता पूर्वीपेक्षा वाढली आहे. 'लाडक्या बहिणी' योजनेअंतर्गत दिला जाणारा भत्ता महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यास मदत करत आहे. अनेक महिलांनी या योजनेचा योग्य उपयोग केल्याची उदाहरणे समोर आली आहेत. तसेच अर्थसंकल्पात एकल महिलांच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. वृद्ध महिलांसाठी पेन्शन, गरिबांसाठी घरे उपलब्ध करून देणे, वृद्धापकाळातील विविध योजनांचे एकत्रीकरण आदी मुद्द्यांवर शासनस्तरावर पाठपुरावा केला जाईल. तसेच कष्टकरी आणि दगडखाण कामगार महिलांचा दक्षता समितीत समावेश करण्याचा विचारही करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## माळशिरस येथे भुलेश्वर विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंवाद मेळावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** सुमारे २७ वर्षांपूर्वी शिक्षण घेतलेल्या व सध्या चाळीशीच्या उंबरठ्यावर असलेल्या माळशिरस येथील भुलेश्वर विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा आम्ही चाळीशीची पोरं या शीर्षकाखाली स्नेहसंवाद मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमास माजी मुख्याध्यापक विश्वास चव्हाण, वर्गशिक्षक अशोक गरड, शिक्षक सुनील जाधव, संजय भुजे, लालासो वाबळे, नंदा इनकाणे, तुकाराम जाधव तसेच संस्थेचे अध्यक्ष अरुण यादव, माजी अध्यक्ष बाळू तात्या यादव, खजिनदार पोपट यादव, मुख्याध्यापक अर्जुन शेंडगे, वरिष्ठ लिपिक सिद्धाराम कांबळे प्रमुख उपस्थित होते.

शिक्षक व माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. संस्थेचे अध्यक्ष अरुण यादव यांनी उपक्रमाचे कौतुक करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. विश्वास चव्हाण यांनी बदलत चाललेल्या शिक्षण पद्धती व संस्कारांबाबत विचार मांडले. अशोक गरड यांनी सिंहगड सहलीतील आठवणी सांगत विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचा प्रसंग सांगितला. सुनील जाधव यांनी भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याबरोबरच कुटुंबाची जबाबदारी जपण्याचे मार्गदर्शन केले.




श्री भुलेश्वर विद्यालयास इन्वर्टर संच देताना माजी विद्यार्थी

माजी विद्यार्थी नितीन यादव यांनी शालेय जीवनातील दंगा-मस्तीच्या आठवणी सांगत विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांची माफी मागितली. तसेच विद्यालयाच्या भिंतीवरील फोडलेल्या फळ्याची आठवणही त्यांनी सांगितली.माजी शिक्षक नवले, माने, शितोळे, लामखडे, सूर्यवंशी यांच्या स्मृतींना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांकडून विद्यालयासाठी इलेक्ट्रिकल इन्व्हर्टर संच देण्यात आला तसेच शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

सुनील महाले, मंगेश गायकवाड, प्रकाश ज्ञानदेव यादव, बाळकृष्ण झिजुरके, सुकेशनी आबले यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. उपस्थित माजी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देण्यात आले तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

क ा र्य क्र म ा च े सूत्रसंचालन विकास यादव यांनी केले तर आभार बबन मुळीक यांनी मानले.

## वारकरी सेवा संघाचे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी : राजाभाऊ चोपदार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** संतांनी समाजसुधारणेचे कार्य करताना जात-धर्म, उंच-नीच असा कोणताही भेदभाव केला नाही. त्यांच्या निरपेक्ष विचारांमुळे समाजप्रबोधन घडले असून आजही त्या विचारांची प्रेरणा समाजाला मिळत आहे. बारामती शहर व तालुका वारकरी सेवा संघाने राबविलेले सामाजिक व धार्मिक उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी व कौतुकास्पद आहेत, असे मत वारकरी सेवा संघाचे राज्य संस्थापक अध्यक्ष राजाभाऊ चोपदार यांनी व्यक्त केले.मोरयानगर, मेडद (ता. बारामती) येथील वारकरी सदन येथे वारकरी सेवा संघाच्या बारामती शहर व तालुका कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्यांना नियुक्तीपत्र प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी राज्य सचिव ॲड. माधवी निगडे, पुणे जिल्हाध्यक्ष निवृत्ती कोळेकर, माजी जिल्हाध्यक्ष किशोर कामठे, बाळासाहेब बारवकर, संजय बोरगे, उपाध्यक्ष दत्तात्रय गावडे, मुळशी तालुकाध्यक्ष पांडुरंग दातीर, राजगड तालुकाध्यक्ष ईश्वर चोरघे यांच्यासह वारकरी संप्रदायातील कीर्तनकार उपस्थित होते.

## बारामती नगरपालिकेत 'महिला दिन' उत्साहात साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती नगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने 'महिला दिन' निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महिलांच्या कायदेशीर हक्क, मानसिक आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कामाच्या ठिकाणची सुरक्षितता आणि कायदेशीर हक्क कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक ॲड. प्रिया गुजर-महाडिक यांनी सर्वप्रथम दिवंगत नेते अजितदादा यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी महिलांना मार्गदर्शन करताना 'कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरुद्धचा कायदा (झजडक अर्ली)' आणि महिलांना मिळणाऱ्या इतर कायदेशीर संरक्षणाबद्दल सविस्तर माहिती दिली. "नोकरी करणाऱ्या महिलांना सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळणे हा त्यांचा हक्क आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले.

तसेच, बदलत्या जीवनशैलीत महिलांचे 'मानसिक आरोग्य' कसे जपावे, यावरही त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

महिला सक्षमीकरणासाठी नगरपालिकेचे धोरण नगरपालिकेचे नगराध्यक्ष सचिन सातव यांनी महिला सक्षमीकरणाबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केली. ते म्हणाले, "नगरपालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात महिलांचे आरोग्य, रोजगार निर्मिती आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी विशेष तरतूद करण्यात येईल." या निर्णयाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.मान्यवरांचे मनोगत कार्यक्रमात महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सविता जाधव, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे आणि वनिता सातकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महिलांना स्वावलंबी होण्यासाठी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी प्रेरणादायी विचार मांडण्यात आले.कार्यक्रमातील उपस्थिती या कार्यक्रमाचे आयोजन महिला व बालकल्याण समितीमार्फत करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन खोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपसभापती रूपाली मलगुंडे यांनी केले. या वेळी बारामती नगरपालिकेच्या नगरसेविका तथा उपगटनेते संपदा चौधर तसेच पालिकेतील सर्व महिला नगरसेविका, नगरपालिका कर्मचारी, मेडिकल कॉलेजचे कर्मचारी आणि बारामती शहरातील विविध क्षेत्रांतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## इंद्रायणी स्वच्छता मोहिमेचे दुसरे पुष्प उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** पवित्र इंद्रायणी नदीच्या संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या 'इंद्रायणी स्वच्छता मोहिमे'चे दुसरे पुष्प रविवारी उत्साहात पार पडले. नागरिक, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत श्रमदानातून नदीकाठ स्वच्छ करण्याचा संकल्प पूर्ण केला.

सकाळपासूनच इंद्रायणी घाट परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळाली. संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी तसेच विविध महाविद्यालयांतील तरुणांनी मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या उपक्रमाला जनआंदोलनाचे स्वरूप मिळाले.

मोहिमेदरम्यान नगरपरिषदेच्या वतीने यंत्रसामग्रीचाही वापर करण्यात आला. १ फोकलेन, २ जेसीबी, ३ ट्रॅक्टर आणि २ टिपर यांच्या साहाय्याने नदीपात्रातील गाळ व कचरा काढण्याचे काम वेगाने करण्यात आले.

घाट परिसरात साकारण्यात आलेली १५ बाय ७ फुटांची 'गालिचा रांगोळी' हे मोहिमेचे विशेष आकर्षण ठरले. या रांगोळीत एका बाजूला 'इंद्रायणी आरती'चे पावित्र्य तर दुसऱ्या बाजूला 'इंद्रायणी स्वच्छता'चा सामाजिक संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला. आदित्य गायकवाड, रचना गवळी, रुची गवळी, प्रितेश गवळी, शुभम सोनावणे आणि प्रथमेश पाटील यांनी सुमारे सहा तास परिश्रम घेऊन ही कलाकृती साकारली.

या मोहिमेचे नेतृत्व नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले.

## महात्मा फुले समता परिषदेच्या पुरंदर तालुकाध्यक्षपदी संतोष कुदळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद यांच्या वतीने पुरंदर तालुकाध्यक्षपदी कोळविहिरे गावचे सामाजिक कार्यकर्ते संतोष बापू कुदळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रविवार दि. १५ मार्च २०२६ रोजी संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.यावेळी पुणे जिल्हाध्यक्ष अनिल लडकत, उपाध्यक्ष रोहिदास कुदळे उपस्थित होते संतोष कुदळे हे सामाजिक कार्यात सक्रिय असून विविध सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.



# साखर कारखान्यांवर डिजीटल वजन काटे बसवा

## साखर कारखान्यांवरील वजन काटे शासनाच्या सर्व्हरशी ऑनलाइन जोडण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यातील साखर कारखान्यांमध्ये उसाच्या वजनात होत असलेल्या कथित 'काटामारी' व रिकव्हरीतील गैरप्रकारांमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सर्व साखर कारखान्यांवर शासनाच्या नियंत्रणाखाली डिजिटल वजन काटे बसवून ते थेट शासनाच्या मुख्य सर्व्हरशी ऑनलाइन जोडावेत, अशी मागणी अहिल्या नगर किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अंकुशराव काळे पाटील यांनी केली आहे.

साखर प्रश्नासंदर्भात श्री काळे यांनी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांना सोमवारी (ता.९) सविस्तर निवेदन दिले. निवेदनात राज्यातील अनेक साखर कारखान्यांमध्ये उसाच्या वजनात फेरफार होण्याच्या तक्रारी सातत्याने येत आहे. काही ठिकाणी उसाच्या वजनात १० ते १२ टक्क्यांपर्यंत घट होत असल्याचा दावा करत, त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूकदार तसेच उसतोड मजूर आर्थिक अडचणीत सापडत असल्याचे त्यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर शासनाने हस्तक्षेप करून सर्व साखर कारखान्यांमध्ये शासनाच्या देखरेखीखाली स्वतंत्र डिजिटल वजन काटे बसवावेत, असे त्यांनी सुचविले आहे. हे काटे थेट शासनाच्या मुख्य सर्व्हरशी जोडले गेल्यास प्रत्येक उसाच्या गाडीचे वजन थेट शासनाच्या नोंदीत उपलब्ध होईल आणि वजनात फेरफार होण्याची शक्यता कमी होईल, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच हे काटे बसवण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यास आमदार-खासदार निधीचा वापर करावा किंवा शेतकऱ्यांच्या संमतीने उसाच्या बिलातून नाममात्र कपात करून ही व्यवस्था उभारावी, अशी सूचनाही त्यांनी केली आहे. जिल्हाधिकारी, साखर सहसंचालक, उत्पादन शुल्क विभाग आणि वजन-मापे नियंत्रण विभाग यांच्या नियंत्रणाखाली ही प्रणाली कार्यान्वित करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.



**साखर आयुक्तांकडे केलेल्या प्रमुख मागण्या**

- शासनाने २०२६-२७ च्या गळीत हंगामापासून ही पारदर्शक डिजिटल प्रणाली लागू करावी.
- राज्यातील सर्व साखर कारखान्यांवर शासनाच्या नियंत्रणाखाली डिजिटल वजन काटे बसवावेत.
- वजन काटे थेट शासनाच्या मुख्य सर्व्हरशी ऑनलाइन जोडावेत.
- उसाच्या प्रत्येक गाडीचे वजन शासनाच्या नोंदीत उपलब्ध होईल अशी प्रणाली उभारावी.
- २०२६-२७ च्या गळीत हंगामापासून ही पारदर्शक व्यवस्था लागू करावी.
- निधीअभावी आमदार-खासदार निधी किंवा शेतकऱ्यांच्या संमतीने उसाच्या बिलातून नाममात्र कपात करून खर्च करावा.

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक जन्म-मृत्यु एसआर-३५/२०२५
नेवासा दिनांक १५/१२/२०२५

अर्जदार श्री/श्रीम-कुमार राजधर गोसावी, रा.पिंप्री शहाली, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. अक्षद कुमार गोसावी रा.पिंप्री शहाली तालुका नेवासा यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-अक्षद कुमार गोसावी, गावाचे नाव-पिंप्री शहाली, जन्म दिनांक-१६/११/२०२१ करिता या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का)
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविणेत येते की,-

खालील परिशिष्टातील वर्णन केलेली मिळकत ही सदर मिळकतीचे विद्यमान मालक तरनुम तनवीर खान, अनिस शफिउद्दीन शेख, रशिदा शकिउद्दीन शेख, शाहीन शफिउद्दीन शेख, हुसनाआरा कमलरअली शेख सर्व रा. जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर (जि. अहमदनगर) हल्ली राहणार कोंडवा जि. पुणे यांचे मालकी वहिवाटीची व कब्जे उपभोगाची आहे. विद्यमान मालकांनी सदर शेतजमीन माझे अशिलांना कायम स्वरूपी विकत घेण्याचे मान्य व कबूल करून त्याबाबत आमचे अशिलांशी खरेदी घेण्या संदर्भात व्यवहार होवुन विसाराची रक्कम साक्षीदार समक्ष दिलेले आहेत. सदर मिळकत ही लिहुन देणार यांची स्वतंत्र मालकी कब्जे वहिवाटीची असून ती निजोखमी व बोजा रहित असल्याची ग्वाही ही आमचे अशिलांस दिलेली आहे. तसेस सदर मिळकती बाबत कोणाचेही तक्रार, हरकत, गहाण, दान, बक्षिस, साठेखत, खरेदी, पोटगी, अव्वल जप्ती, मनाई हुकूम, वहिवाट, कुळ, बोजा, कर्ज, इकरार अथवा इतर हक्क व हितसंबंध असतील किंवा कुठल्याही न्यायालयात न्यायाधिकरणातील वादात सदर मिळकत आहे वा विद्यमान मालकांचे मिळकतीत योग्य व कायदेशिर हक्क नाहीत अशी तक्रार असल्यास संबंधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून सात दिवसाचे आत सदर हक्का बाबत वा तक्रारी बाबत त्याचे लेखी म्हणणे कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे दाखल करावेत तसे न अथवाकेल्यास सदर मिळकतीत कोणाचाही कुठलाही हक्क व अधिकार नाही वा असल्यास तो त्यांनी स्वतः होवून सोडून दिलेला आहे असे समजून मिळकत निजोखमी आहे असे समजून माझे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही व ती तक्रार माझे अशिलावर बंधनकारक रहाणार नाही.

परिशिष्ट

मौजे जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर येथील व मे. दुय्यम निबंधक साहेब जामखेड यांच्या हद्दीतील शेतजमीन मिळकतीचे वर्णन व चतुः सिमा खालील प्रमाणे-गट नंबर ७४९ यामधील विद्यमान मालक तरनुम तनवीर खान, अनिस शफिउद्दीन शेख, रशिदा शफिउद्दीन शेख, शाहीन शफिउद्दीन शेख, हुसनाआरा कमलरअली शेख यांचे मालकीचे क्षेत्र ० हे-२८ आर अधिक पो.ख.०हे-२४.५० आर असे एकूण ०हे-५२.५० आर क्षेत्र ही संपूर्ण मिळकत याची

चतुःसिमा- पुर्वेस- गट नं. ७४८, दक्षिणेस - लागु नदी, पश्चिमेस - रत्नापूर शिव व गट नं. ७७९ पैकी जमीन, उत्तरेस- गट नं.७५०,७७१,७७२ व ७५३

येणे प्रमाणे चतुः सिमांकीत ०हे-५२.५० आर मिळकत यातील दगडमाती, झाडे झुडपे इत्यादी तदंगभुत वस्तुसह वरील प्रमाणे चतुः सिमा पूर्व मिळकत. सदरची जाहीर नोटीस ही देणार व घेणार यांच्या सुचने प्रमाणे व माहिती वरून दिली आहे.

स्थळ-जामखेड,
दिनांकः-११/०३/२०२६

तर्फे,
**ॲड. के.डी. गायकवाड,**
**रा.ता. जामखेड, जि. अहमदनगर,**
**मो.नं.-९७८८६६४६०८,**

**खरेदी घेणार/आमचे अशिल**
**शेख नादीर रशिद,**
**जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर.**

# पुण्यातील खुनाचा कट रचणारा आरोपी अहिल्यानगरमध्ये पकडला



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** – पुणे येथील खुनाचा कट केल्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एमआयडीसी परिसरात जेरबंद केले आहे.

याबाबत माहिती अशी की खंडणी विरोधी पथक -०२ गुन्हे शाखा, पुणे शहर चे अधिकारी यांनी अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. किरणकुमार कबाडी यांना कोंढवा पोलीस स्टेशन जि. पुणे गु. र. नं. १८४/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ५५, ६१, ३(५), आर्म ॲक्ट ३/२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) १३५ प्रमाणे अग्नीशस्त्रसह खुनाचा कट केल्या बाबत गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यातील आरोपी ओंकार दयानंद पवार हा अहिल्यानगर परिसरात आल्याची माहिती देवुन सदर आरोपीस ताब्यात घेणेबाबत कळविले होते.

त्यानंतर पो. नि. किरणकुमार कबाडी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी सपोनि हरिष भोये, पोलीस अंमलदार दिपक घाटकर, विष्णु भागवत, फुरकान शेख, शामसुंदर जाधव, योगेश कर्डीले, प्रशांत जाधव, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत यांचे पथक तयार करुन एम.आय.डी.सी. अहिल्यानगर येथे आरोपीचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या.

पथकाने एम.आय.डी.सी. परिसरात आरोपीचा शोध घेत असतांना शिवाजीनगर अमरदीप पेट्रोल पंपाशेजारी एक इसम संशयीतरित्या फिरतांना दिसुन आला. तेव्हा पथकाने त्यास ताब्यात घेतले. ओंकार दयानंद पवार वय- २४ वर्षे रा. गुलटेकडी पुणे असे त्याचे नाव असून त्याच्याकडे सखोल व बारकाईने विचारपुस करता त्याने गुन्हे केल्याची कबुली दिलेली आहे. आरोपी यास खंडणी विरोधी पथक -०२ गुन्हे शाखा, पुणे शहर यांच्या ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास गुन्हे शाखा, युनिट ०५, पुणे शहर हे करीत आहे.

## द•ख•ल

### महाराष्ट्र स्टेट लीगमध्ये फिरोदिया शिवाजियन्सला चौथे स्थान

**अहिल्यानगर** : फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल संघाने थखरू महाराष्ट्र स्टेट लीग चॅम्पियनशिप स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात दमदार कामगिरी करत आपली छाप उमटवली आहे. पाच सामने पूर्ण झाल्यानंतर संघाने गुणतालिकेत चौथे स्थान मिळवले असून, महाराष्ट्रातील बलाढ्य संघांविरुद्ध खेळताना जिद्द, संघभावना आणि आक्रमक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

स्पर्धेतील सर्वात मोठा विजय फिरोदिया शिवाजियन्सने मुंबई एफसीसारख्या बलाढ्य संघाविरुद्ध मिळवला. या सामन्यात संघाने आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर मात केली आणि स्पर्धेत आपली ताकद दाखवून दिली.

जीओजी फिन क्यू संघाविरुद्धच्या सामन्यातही फिरोदिया शिवाजियन्सने लढाऊ वृत्ती दाखवली. सामन्याच्या पहिल्याच दहा मिनिटांत दोन गोलांनी पिछाडीवर पडलेल्या संघाने शानदार पुनरागमन करत २२ अशी बरोबरी साधली. विशेष म्हणजे हा संघ पुणे लीगचा विजेता असून, त्यामध्ये संतोष ट्रॉफीचे अनुभवी खेळाडू आहेत.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण ईस्ट एफसी विरुद्धच्या सामन्यातही फिरोदिया शिवाजियन्सने जिद्दीचा खेळ करत ०१ पिछाडीवरून ११ अशी बरोबरी साधली. तर मॅजिक मेड एफसी विरुद्धच्या सामन्यात संघाने उत्कृष्ट बचाव आणि नियोजनबद्ध खेळ करत १० असा महत्त्वपूर्ण विजय मिळवला. पहिल्या टप्प्यातील शेवटच्या सामन्यात नाशिक सिटी एफसी विरुद्ध संघाला २५ असा पराभव स्वीकारावा लागला. मात्र संपूर्ण स्पर्धेत संघातील खेळाडूंनी जिद्दीने लढत देत चांगली कामगिरी केली. या मोहिमेदरम्यान संघातील अनेक खेळाडूंना दुखापतींचा सामना करावा लागला. तरीही संघाचे फिजिओ डॉ. आश्री बगदादी यांनी खेळाडूंना लवकरात लवकर तंदुरुस्त करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

### सरोज आल्हाट यांना कस्तुरबा गांधी समाजसेवा पुरस्कार जाहीर

**अहिल्यानगर** : येथील सामाजिक कार्यकर्त्या, साहित्यिक व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांची राज्यस्तरीय 'श्रीमती कस्तुरबा गांधी समाजसेवा पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली आहे. जळगाव येथील तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीतर्फे हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्काराचे वितरण २९ मार्च रोजी जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित विशेष समारंभात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. जावेद शेख यांनी दिली आहे.

सरोज आल्हाट गेल्या सुमारे ३० वर्षांपासून विविध सामाजिक संस्थांमधून पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. समाजातील दलित, शोषित, दारिद्र्यग्रस्त, आदिवासी, बालकल्याण, परित्यक्ता महिला, युवकांचे प्रश्न, एड्सग्रस्त रुग्ण, कुष्ठरुग्ण, अंध तसेच इतर वंचित घटकांसाठी त्यांनी सातत्याने सामाजिक, विकासात्मक आणि धोरणात्मक स्तरावर काम केले आहे.त्यांच्या 'गार्डियन एंजल्स' या संस्थेमार्फत परावलंबी व दुर्धर आजारांनी पीडित रुग्ण तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सेवा उपक्रम राबवले जातात. या संस्थेमार्फत गरजू रुग्णांना आधार देण्याबरोबरच त्यांची वैयक्तिक काळजी, आरोग्यविषयक मदत आणि मानसिक आधार देण्याचे कार्यही केले जाते. याशिवाय त्यांच्या 'द म्युझिकल मूड्स' या ग्रुपच्या माध्यमातून रुग्णांना डिप्रेशनमधून बाहेर काढण्यासाठी मोफत म्युझिक थेरेपी दिली जाते.

### अहिल्यानगरात १९ मार्चला ग्लोबल ब्रेन ड्रेन आंदोलन

**अहिल्यानगर** : जगभर वाढत चाललेल्या युद्ध आणि संघर्षांच्या पार्श्वभूमीवर मानवतेच्या रक्षणासाठी आणि मध्यपूर्वेतील युद्ध तातडीने थांबवण्याच्या मागणीसाठी अहिल्यानगर शहरात ग्लोबल ब्रेन ड्रेन आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १९ मार्च रोजी दिल्ली गेट परिसरात हे आंदोलन होणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

ॲड. गवळी यांनी सांगितले की, सध्या मध्यपूर्व आणि आखाती प्रदेशात सुरू असलेल्या संघर्षामुळे जगभर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या युद्धामुळे मोठ्या प्रमाणावर निरपराध नागरिकांचा बळी जात असून लाखो लोकांना विस्थापित व्हावे लागत आहे. याशिवाय नैसर्गिक संपत्ती, पर्यावरण, पायाभूत सुविधा आणि मानवी विकासावरही गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. युद्धामुळे मानवी प्रगतीला मोठा धक्का बसत असून विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या माध्यमातून निर्माण झालेली मानवी क्षमता विनाशाच्या दिशेने वळत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर जागतिक शांततेचा संदेश देण्यासाठी आणि युद्धविरोधी भूमिका ठामपणे मांडण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

## अहिल्यादेवी होळकर स्मरणार्थ सांस्कृतिक सभागृहांचे काम प्रगतीपथावर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मरणार्थ बांधण्यात येणाऱ्या जिल्ह्यातील सांस्कृतिक सभागृहांचे काम प्रगतीपथावर आहे. एकूण ४ गावांच्या ठिकाणी (रु. १००.०० लक्षच्या मर्यादेत ) त्या पैकी निमगाव घाणा, नगर तालुका, मोहरी तालुका पाथर्डी अहिल्यानगर या ठिकाणी काम चालू आहे. या कामाची प्रत्यक्ष पाहणी करत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता युवराज कोकरे, उपाभियंता राहुल कांबळे यांनी काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या. यावेळी धनगर संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष तथा आर्ट ऑफ लिविंगचे जिल्हा समन्वयक योग शिक्षक पांडुरंग धोंडिबा दातीर, लेखाधिकारी ए वाय नरोटे, समाज कार्यकर्ते गविनाथ नरोटे ,पोपट नरोटे ,उपसरपंच संजू नरोटे ,सरपंच पोपटराव वाल्हेकर,पप्पू नरोटे आदी उपस्थित होते

धनगर समाज संघर्ष समितीचे (महाराष्ट्र राज्य) संस्थापक अध्यक्ष माजी खासदार पद्मश्री. डॉ.विकास महात्मे, इंजि.डी.आर. शेंडगे, तत्कालीन धनगर समाज संघर्ष समिती जिल्हा अध्यक्ष यांच्या विशेष प्रयत्नातून आणि ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मरणार्थ सांस्कृतिक सभागृह बांधण्यास मान्यता दिली. त्यानुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण ६१ सभागृहांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

## अरणगाव दुमाल्याच्या 'डाकू' श्वानाला तालुकास्तरीय प्रदर्शनात प्रथम पारितोषिक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : जिल्हा परिषद अहिल्यानगर पशुसंवर्धन विभाग व पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या वतीने कोळगाव येथे आयोजित तालुकास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन २०२६ मध्ये अरणगाव दुमाला येथील आरण्यागिरी रिसॉर्टच्या तिबेटीअन बखरवाल जातीच्या 'डाकू' नावाच्या श्वानाने सर्वांचे लक्ष वेधून घेत प्रथम क्रमांक पटकावला.

सिंहासारखी आयाळ व दिमाखदार शरीरयष्टी असलेल्या डाकूच्या दबदब्याने प्रदर्शनातील इतर श्वानांसह उपस्थित प्रेक्षकांमध्येही कुतूहल निर्माण झाले. प्रदर्शनात उतरताच त्याच्या भव्य देहयष्टीने परीक्षकांचे मन जिंकत प्रथम क्रमांकावर शिक्कामोर्तब केले.

यावेळी विद्यमान आमदार विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांनी डाकूची माहिती जाणून घेत त्याचे कौतुक केले. गटविकास अधिकारी राणी फराटे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. गोरख सातकर, तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. श्रीधर गादेवार, ज्येष्ठ नेते दिनूकाका पंधरकर, पिंपळगाव पिसा सरपंच किशोरराव पंधरकर यांनीही डाकूचे कौतुक केले.




या प्रदर्शनात सहभागासाठी पेडगाव मंडळ पशुसंवर्धन अधिकारी अश्विनी गायकवाड यांचे सागर शितोळे यांना सहकार्य लाभले. अरण्यागिरीचे मालक इंजी. संकेत अरुण काळे यांच्या वतीने सागर शितोळे यांनी प्रदर्शनात सहभाग घेऊन डाकूचे प्रथम पारितोषिक स्वीकारले.

## श्रीगोंद्यात 'मोहब्बतवाली इफ्तार' सलोखा, बंधुभावाचा सुंदर संदेश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : शहरात सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकात्मतेचा संदेश देण्यासाठी श्रीगोंदा काँग्रेसच्या वतीने 'मोहब्बतवाली इफ्तार' पार्टीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. शहरातील जामा मशिद येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला विविध समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकोप्याचा संदेश दिला.

आमदार हेमंत ओगले यांच्या मित्र परिवाराच्या पुढाकारातून गेल्या सुमारे १४१५ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे. सामाजिक एकोपा, जातीय सलोखा आणि परस्पर प्रेमभावना दृढ करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे उपस्थितांनी सांगितले.या कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध व कौशल्यपूर्ण पद्धतीने केले. कार्यक्रमाला प्रशांत ओगले (संचालक, श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समिती), नगरसेवक अख्तर भाई शेख, पांडुरंग पोटे, संतोष भोईटे (अध्यक्ष, श्रीगोंदा तालुका काँग्रेस), ॲड. समीर बोरुडे, युवक अध्यक्ष विकास काळे, शहराध्यक्ष मुजफ्फर मालजदे, फिरोज जकाते, शाहरुख जकाते, संतोष खेतमाळीस, झहीर जकाते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.जामा मशिदीच्या वतीने मौलाना आतार, रिजवान भाई जमादार, इलाही मालजदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. त्यांच्या या कार्याचे उपस्थितांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले.या 'मोहब्बतवाली इफ्तार' पार्टीच्या माध्यमातून श्रीगोंदा शहरात सामाजिक सलोखा, परस्पर आदर आणि बंधुभावाचा सकारात्मक संदेश देण्यात आला.

## पद हे दाखवायचे नसून ती जबाबदारी : अक्षय कर्डिले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक लवकरच होण्याची शक्यता असताना मजले चिंचोली येथे ग्रामस्थांच्या वतीने 'विजयाचा संकल्प मेळावा' मोठ्या उत्साहात पार पडला. पांगरमल, घोसपुरी, आव्हाडवाडी, साकेवाडी, उदरमल या परिसरातील ग्रामस्थांच्या सहभागाने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन वैभव ढाकणे यांनी केले होते. यावेळी भाजपाचे युवा नेते अक्षय कर्डिले यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रा. माणिकराव विधाते, संदीप कर्डिले, नगरसेवक सुरेश बनसोडे, जेऊरचे सरपंच आदिनाथ बनकर, बंडू पवार, मजले चिंचोलीचे सरपंच अमित आव्हाड, धर्मनाथ आव्हाड, बी. वाय. आव्हाड, हरिदास कदम, भाऊराव ढाकणे, खोसपुरीचे माजी सरपंच सोमनाथ हारेर, बाबा शेख, भीमानाना आव्हाड, पांगरमलचे सरपंच अमोल आव्हाड, बाप्पू आव्हाड, भीमराज आव्हाड, आव्हाडवाडीचे सरपंच तुकाराम आव्हाड, डोंगरवाडीचे सरपंच उद्धव गिते, रामकिसन आव्हाड आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना अक्षय कर्डिले म्हणाले की, माझे वडील स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी गेली जवळपास ३० वर्षे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले.

## मिलन बँक्वेट हॉलमधील प्रतिमांच्या कथित अवमानाबाबत चौकशीची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : हरियाणा राज्यातील फरीदाबाद जिल्ह्यातील सिक्री येथे असलेल्या मिलन बँक्वेट हॉलमध्ये राष्ट्रातील महान व्यक्तिमत्त्वांच्या प्रतिमांचा कथित अवमान झाल्याच्या प्रकरणी महाराष्ट्र शासनाने गंभीर दखल घेतली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत हरियाणा राज्य सरकारच्या उपसचिवांना अधिकृत पत्र पाठविले आहे.

या संदर्भात शहरातील सामाजिक कार्यकर्ते हरजितसिंह वधवा यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने या तक्रारीची नोंद घेतली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाचे उपसचिव महेश वाव्हळ यांनी हरियाणा शासनाला पाठविलेल्या पत्राची प्रत वधवा यांना पाठवून माहिती देण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी हरियाणा राज्यातील फरीदाबाद येथील सिक्री परिसरातील मिलन बँक्वेट हॉलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी पद्मिनी यांच्या प्रतिमांचा वापर स्वच्छतागृह दर्शक (टॉयलेट साइनबोर्ड) म्हणून केल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडिओनंतर देशभरातून संतापाची लाट उसळली. राष्ट्राच्या इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचा अशा प्रकारे अवमान करण्यात आल्याचा आरोप करत अनेकांनी तीव्र निषेध व्यक्त केला.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथील सामाजिक कार्यकर्ते हरजितसिंह वधवा यांनी पुढाकार घेत औपचारिक तक्रार दाखल केली. त्यांनी हरियाणा पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री कार्यालय, सांस्कृतिक कार्य विभाग आणि गृह विभाग यांना ई-मेलद्वारे तक्रार नोंदवली. या तक्रारीत संबंधित घटनेची सखोल चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती.

## बालविवाह प्रतिबंधासाठी सामाजिक वज्रमुठ बांधण्याची आवश्यकता : अब्दुले




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : बालविवाह करणे आणि ते घडवून आणणे हे अप्रगत समाजाचे लक्षण आहे. कायद्याने मुलीला मुलाप्रमाणेच समान हक्क आणि अधिकार बहाल केले आहेत. आज घडीला देखील समाज मात्र मुलीला ओझे समजून दुय्यम स्थान देत असल्याची अनेक उदाहरणे पहावयास मिळते. बाल-विवाहबाबत समाजाने मुला-मुलींच्या आयुष्य आणि भविष्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार करून प्रसंगी कायद्याचा आधार घेऊन बालविवाह रोखण्यासाठी सजग राहावे असे प्रतिपादन स्नेहालय उडान बालविवाह प्रतिबंधक अभियानाचे समन्वयक योगेश अब्दुले यांनी केले. ते कर्जत येथे स्नेहालय उडान प्रकल्प, जिल्हा महिला बालविकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि पंचायत समिती कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बालविवाह प्रतिबंध जाणीव जागृती कार्यशाळा प्रसंगी बोलत होते.

यावेळी विचार मंचावर कर्जतचे बालविकास प्रकल्प अधिकारी दीपक मेहेत्रे, चाईल्ड लाईन केंद्र समन्वयक महेश सूर्यवंशी, सुनंदा सुडके, वैशाली राजगुरू, महिला सक्षमीकरण केंद्राच्या पूजा ढेरे, विपला फाउंडेशनच्या अड. शुभांगी रोहकले, सामाजिक कार्यकर्ते फारुख बेग, राहुल कांबळे, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सावित्रा कदम आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना अब्दुले म्हणाले की, सामाजिक जाणिवा अधिक प्रगल्भ करत मुलगा-मुलगी असा भेदभाव न करता समता स्थापित करण्यासाठी समाजाने परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करून बालविवाह प्रतिबंधासाठी सामाजिक वज्रमुठ निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाने दक्ष आणि तत्पर राहायला हवे. बालविकास प्रकल्प अधिकारी दीपक मेहेत्रे म्हणाले की, बालवयात मुला-मुलींची लग्ने लावून त्यांच्या आरोग्यावर,मानसिक विकासावर आणि आनंदी जीवनावर परिणाम होतो. लहान वयात लग्न लावून दिल्याने संपूर्ण समाजात मागासलेपणा येते.

### कार्यशाळेत प्रत्येक गाव बाल-विवाहमुक्त करण्याचा अंगणवाडी सेविकांचा निर्धार

#### कुटुंबात समानता असेल तरच समाजात समता नांदेल : रोहकले

कौटुंबिक हिंसाचारापासून मुली आणि महिलांना अनेक पातळीवर संघर्ष करावा लागतो. बालवयामध्येच विवाह लावून दिले जात असल्याने त्याचे परिमाण राष्ट्राला भोगावे लागते. जनजागृती करून देखील समाज मात्र कायद्याविरुध्द भूमिका घेत बालविवाह घडवून आणत आहे. यास प्रतिबंध करण्यासाठी मुलींच्या उच्च शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहन देणे ही सामाजिक जबाबदारी असून कुटुंबात समानता असेल तरच समाजात समता नांदेल असे परखड मत मांडले. उडान बालविवाह प्रतिबंधक अभियान आणि चाईल्ड लाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

## सीना नदीवरील पुलाच्या कामामुळे वाहतूकीत बदल : कल्याण रोडची वाहतूक लिंक रोडवरून

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** – शहरातील कल्याण -अहिल्यानगर- पाथर्डी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील सीना नदीवरील मोठ्या पुलाचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर असून पुलाच्या सुपर स्ट्रक्चरलसाठी ग्रायडर लॉन्चिंगचे काम करण्यात येणार आहे. सदर काम १६ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. सदर कामासाठी पुलाजवळ मोठ्या आकाराचे गर्डर तयार करण्यात आले असून ते बसविण्यासाठी मोठ्या क्षमतेच्या क्रेन व ट्रेलरचा वापर करण्यात येणार आहे. संबंधित रस्ता हा अत्यंत वर्दळीचा असल्यामुळे कामकाजादरम्यान अपघात होण्याची किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच वाहतूक सुरळीत राहण्यासाठी अहिल्यानगर – दौंड मार्गावरील कायनेटिक चौक ते अरणगाव बायपास या मार्गावरील




वाहतुकीत तात्पुरता बदल करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने दि. १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ०८.०० वा. पासून ते दि. ३१ मार्च २०२६ रोजी रात्री ०८.०० वा. पर्यंत सीना नदी पुलाजवळील वाहतूक खालीलप्रमाणे वळविण्यात येणार आहे.

१) नेप्ती नाका कडून कल्याण बायपासकडे जाणारी वाहतूक :

नेप्ती नाका सक्कर चौक कायनेटिक चौक रंगोली हॉटेल लिंक रोड मार्गे इच्छित स्थळी जावी. तसेच लहान वाहनांसाठी पर्यायी मार्ग नेप्ती नाका काटवन खंडोबा रोड मार्गे जावे.

२) कल्याण बायपासकडून नेप्ती नाक्याकडे येणारी वाहतूक : कल्याण बायपास लिंक रोड रंगोली हॉटेल (केडगाव) मार्गे इच्छित स्थळी जावी. नागरिकांनी व वाहनचालकांनी वरील पर्यायी मार्गाचा वापर करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री



# डॉ. संदीप वासलेकर व पोपटराव पवार यांनी घेतले शनी दर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : अभ्यासक व विचारवंत डॉक्टर संदीप वासलेकर पुरस्कार कर्ते सोबत पद्मश्री पोपटराव पवार यांनी शनि देवाचे चौथ्यावर जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर डॉ. संदीप वासेकर यांना यशवंत सामाजिक जाहीर झालेला पुरस्कार घेण्यासाठी नेवासा येथे माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या कार्यक्रमास उपस्थिती त्यांनी नोंदवली. श्री क्षेत्र शनिशिंगणापूर मंदिरामध्ये अभिषेक, धार्मिक विधी करण्यासाठी काही वेळ त्यांनी घालवला. त्यांच्यासोबत लेखक अरुण शेवते, एडवोकेट सयाराम बानकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. दर्शनाने वासलेकर यांचे मन प्रफुल्लित होऊन त्यांनी समाधान व्यक्त केले.

# महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा ३९ वा पदवीदान समारंभ उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता शेतकरी व ग्रामीण समाजाच्या विकासासाठी करावा, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या ३९ व्या पदवीदान समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे तसेच नवी दिल्ली येथील भाकृअपचे माजी संचालक डॉ. अशोक कुमार सिंग प्रमुख उपस्थित होते.

व्यासपीठावर कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले की, १९६९ मध्ये स्थापन झालेल्या



महात्मा फुले कृषी विद्यापीठाने गेल्या पाच दशकांत कृषी विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विद्यापीठाने ३२० उच्च उत्पादक वाण, ५६ कृषी अवजारे आणि १९२५ सुधारित तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले आहे. तसेच सुमारे दीड लाखांहून अधिक कुशल मनुष्यबळ घडविले आहे. विद्यार्थ्यांनी नवोन्मेष, उद्योजकता आणि तंत्रज्ञानाधारित उपायांचा स्वीकार करून शाश्वत शेतीचा मार्ग मजबूत करावा, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्य सरकार शेती क्षेत्राच्या विकासासाठी विविध योजना राबवत आहे. ऊर्जा सुरक्षा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज देण्याचा सरकारचा मानस आहे.

हवामान बदलामुळे शेतीसमोर नवीन आव्हाने निर्माण झाली असून जैवतंत्रज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यावर मात करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता व डिजिटल तंत्रज्ञानामुळे शेतीतील खर्चात बचत होऊन उत्पादनात वाढ होत असल्याचे त्यांनी सांगितले. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विद्यार्थ्यांना केवळ नोकरी शोधणारे न राहता कृषी उद्योजक बनण्याचे आवाहन केले. अन्नप्रक्रिया, कृषी सेवा केंद्र, स्टार्टअप्स, सेंद्रिय शेती आणि कृषी पर्यटन या क्षेत्रांत मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही मानद पदवी प्रदान करण्यात आली. समारंभात ७४ विद्यार्थ्यांना पीएच.डी., ३४६ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी आणि ४,१८२ विद्यार्थ्यांना पदवी अशा एकूण ४,६०२ पदव्या देण्यात आल्या.

तसेच विविध शाखांतील गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण व रौप्य पदकांनी गौरविण्यात आले. समारंभाच्या प्रारंभी सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाला विविध मान्यवर, शास्त्रज्ञ, अधिकारी, विद्यार्थी आणि प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मांडवे बुद्रुक येथे वनविभागाच्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील मांडवे बुद्रुक (भगवान मळा) येथील पप्पू कारभारी खेमनर यांच्या शेतात दोन दिवसांपूर्वी वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला आहे. संगमनेर तालुक्याच्या साकुर पठार भागातील, विविध गावांमध्ये सध्या बिबट्याने चांगला धुमाकूळ घातला आहे . रात्री अपरात्री शेतकऱ्यांना अक्षरशः शेतात जीव मुठीत धरून शेतमालाला पाणी भरावे लागत आहे. काही दिवसांपूर्वी मांडवे बुद्रुक, बिरेवाडी येथे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबटे जेरबंद झाले होते. मात्र बिबट्याचा संचार अजूनही थांबायच नाव घेत नाही. बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात असून नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मांडवे बुद्रुक येथे बिबट्यांनी तळच ठोकला होता बिबट्यांच्या भितीने मांडवेकर अक्षरशः भयभीत झाले होते गेले . त्यामुळे या बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने तातडीने पिंजरा लावण्यात यावा अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली होती त्यानुसार वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी भगवान मळा येथील पप्पू कारभारी खेमनर यांच्या शेतात बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावला होता. त्यात त्याला खाण्यासाठी पक्ष ठेवण्यात आले होते. त्या पक्षाच्या लालसेने तो बिबट्या पिंजऱ्यात आला आणि अलगद अडकला मांडवी परिसरात बिबट्या पकडला असल्याची माहिती वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना दिली. त्यानंतर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पकडलेला बिबट्या मित्रासह वनविभागाच्या नर्सरीत घेऊन गेले.

# जिल्हा कुष्ठरोग पर्यवेक्षक डॉ. संजय दुशिंग यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : राज्य शासनाच्या आरोग्य विभागात ३५ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावून जिल्हा कुष्ठरोग पर्यवेक्षक पदावरून सेवानिवृत्त झालेल्या डॉ. संजय चोखाजी दुशिंग यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा श्रीरामपूर येथे उत्साहात संपन्न झाला. येथील स्वयंवर मंगल कार्यालयात डॉ. संजय दुशिंग सत्कार समितीच्या वतीने डॉ. संजय दुशिंग व त्यांच्या पत्नी विणा दुशिंग यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी आत्या हौसाबाई खाजेकर यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास आरोग्य सेवा विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. राजेंद्र खंडागळे, माजी प्राचार्य टी. ई. शेळके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी माजी जिल्हा चिकित्सक डॉ. वसंतराव जमधडे होते.

प्रमुख वक्ते म्हणून प्रा. लक्ष्मण कोल्हे उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज व महात्मा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. सत्कार समितीच्या वतीने सन्मानपत्र, भारतीय संविधानाची प्रत, शाल, पुष्पहार व भेटवस्तू देऊन दुशिंग दांपत्याचा गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. राजेंद्र खंडागळे यांनी डॉ. दुशिंग यांची कुष्ठरोग निर्मूलनासाठीची सेवा आदर्शवत असल्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देताना डॉ. दुशिंग यांनी सहकारी, कुटुंबीय व समाजातील सेवाभावी व्यक्तींमुळेच आपला सेवाप्रवास यशस्वी झाल्याचे नमूद केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसन्न धुमाळ व प्रविण जमधडे यांनी केले, तर आभार गोरख आढाव यांनी मानले.

# टेलटँकच्या आवर्तनातून गावतळे, बंधारे भरण्यात यावे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील गावतळ्यात तसेच गावातील बंधार्यात टेलटँकच्या आवर्तनातून पाणी सोडण्यात यावे. जेणेकरून या परिसरात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नाही. अशी मागणी येथील ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे उपविभागीय अधिकारी वडाळा पाटबंधारे विभाग, श्रीरामपूर यांचेकडे केली आहे. या निवेदनात नमूद केले आहे की, सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. बहुतांशी ठिकाणी विहीरींनी तळ गाठल्याने पिण्याच्या पाण्याचे संकट उभे ठाकले गेले आहे. भविष्यात पिण्याच्या पाण्याची परिस्थिती भयावह होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून पशूधनही संकटात सापडणार आहे. तरी या सर्व बाबींचा विचार करून सध्या सुरू असलेल्या टेलटँकच्या आवर्तनातून टाकळीभान गावतळे, ओढे, बंधारे भरण्यात यावे अशी मागणी पाटबंधारे खात्याकडे निवेदनाद्वारे ग्रामस्थांनी केली आहे.या निवेदनावर पंकज पटारे, राहल कोकणे, काकासाहेब कोकणे, विलास बोडखे, प्रशांत कोकणे, निखिल पटारे, संदिप पटारे, अजय दुधाळे, मनोज परदेशी, रमेश पटारे, नवनाथ खंडागळे आदींच्या सह्या आहे.

# अन्नदाता ते ऊर्जादाता

## संजीवनीच्या सीएनजी प्रकल्पामुळे आत्मनिर्भरतेकडे मोठे पाऊल : विवेक कोल्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक देशांमध्ये इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असताना भारताने मात्र सक्षम नेतृत्वामुळे स्थैर्य टिकवून ठेवले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्ट्रॅटेजिक इंधन साठ्यांमुळे देशात इंधनटंचाई किंवा मोठी दरवाढ होण्याची परिस्थिती निर्माण झालेली नाही. तरीही भविष्यातील संभाव्य आव्हानांचा विचार करता भारताने ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होणे ही काळाची गरज असल्याचे मत कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी व्यक्त केले. देशात मोठ्या प्रमाणावर क्रूड ऑइल आणि सीएनजीसारखे इंधन परदेशातून आयात केले जाते. विशेषतः स्ट्रीट ऑफ होर्मुझ या महत्त्वाच्या समुद्री मार्गातून मोठ्या प्रमाणावर इंधन भारतात येते. गेल्या वर्षभरातील आकडेवारीनुसार जवळपास साडेपाच हजार जहाजांमधून सीएनजी भारतात आयात करण्यात आले असून त्यासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. त्यामुळे देशाला ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर करण्यासाठी पर्यायी ऊर्जा स्रोत निर्माण करणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील संजीवनी उद्योग समूह अंतर्गत असलेल्या सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने उभारलेला सीएनजी प्रकल्प हा सहकार क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरला आहे. सहकारी तत्वावरील साखर कारखान्यांमध्ये अशा प्रकारचा सीएनजी प्रकल्प सुरू करणारा हा देशातील पहिलाच उपक्रम ठरला आहे.

या प्रकल्पाचे उद्घाटन देशाचे सहकार आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते झाले होते. या प्रकल्पामधून



दररोज सुमारे १२ टना पर्यंत सीएनजी उत्पादन करण्याची क्षमता उपलब्ध आहे. या इंधनावर जवळपास तीन हजार वाहनं रोज चालू शकतात. अनेक वाहनांमध्ये ड्युअल फ्यूल प्रणाली असल्यामुळे पेट्रोलसह सीएनजीचा वापरही करता येतो. त्यामुळे वाहनचालकांना परवडणारे आणि पर्यावरणपूरक इंधन उपलब्ध होत आहे. शेतकऱ्यांच्या ऊसापासून तयार होणाऱ्या उपउत्पादनांचा वापर करून तयार होणारे हे इंधन ऊर्जा निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्यामुळे शेतकरी केवळ अन्नदाता न राहता ऊर्जादाता बनत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळत आहे. संजीवनी कारखान्याचा हा प्रकल्प आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असल्याचे विवेकभैय्या कोल्हे यांनी सांगितले.उपपदार्थ निर्मितीत संजीवनी उद्योग समूह नेहमीच अव्वल राहिला आहे.माजी मंत्री स्व.शंकरराव कोल्हे यांच्या पश्चात त्यांनी बघितलेले स्वप्न साकार होत आहे अशी भावना कोल्हे यांनी व्यक्त केली.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणूक मतदान २३ एप्रिल रोजी तर मतमोजणी चार मे रोजी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नुकताच निवडणूक आयोगाने देशातील सहा राज्यांतील आठ विधानसभा मतदारसंघांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील राहुरी (जि. अहिल्यानगर) आणि बारामती (जि. पुणे) या दोन विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजी भानुदास कर्डिले आणि बारामती मतदारसंघाचे आमदार अजित अनंतराव पवार यांच्या निधनामुळे या जागा रिक्त झाल्या असून त्यांच्या रिक्त जागेसाठी ही पोटनिवडणूक घेतली जाणार आहे. निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी आवश्यक कार्यक्रम जाहीर केला असून मतदानासाठी सर्व मतदान केंद्रांवर इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन आणि व्हीव्हीपॅट यांचा वापर करण्यात येणार आहे.

मतदारांची ओळख पटवण्यासाठी मतदार फोटो ओळखपत्र हा मुख्य पुरावा असेल. याशिवाय आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, बँक किंवा पोस्ट



ऑफिस पासबुक, मनरेगा जॉब कार्ड, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड आदी कागदपत्रेही ग्राह्य धरली जाणार आहेत. दरम्यान, निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच राहुरी मतदारसंघात आचारसंहिता तत्काळ लागू झाली आहे. तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांची माहिती उमेदवार आणि राजकीय पक्षांनी प्रचार काळात तीन वेळा प्रसिद्ध करणे बंधनकारक असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले आहे. भारत निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार पोटनिवडणुकीसाठी मतदान २३ एप्रिल २०२६ रोजी होणार असून मतमोजणी ४ मे २०२६ रोजी केली जाणार आहे. आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ३० मार्च २०२६ (सोमवार) रोजी निवडणुकीसाठी राजपत्र अधिसूचना जारी केली जाईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ एप्रिल २०२६ (सोमवार) निश्चित करण्यात आली आहे. दाखल झालेल्या अर्जांची छाननी ७ एप्रिल २०२६ (मंगळवार) रोजी होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल २०२६ (गुरुवार) आहे. त्यानंतर संबंधित मतदारसंघांमध्ये २३ एप्रिल २०२६ (गुरुवार) रोजी मतदान पार पडेल. मतदान पार पडल्यानंतर दिनांक ४ मे २०२६ (सोमवार) रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल.

तर संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ६ मे २०२६ (बुधवार) पर्यंत पूर्ण केली जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने सर्व यंत्रणांना आवश्यक तयारी करण्याच्या सूचना दिल्या असून आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# श्रीरामपूर नगर परिषदेत मुख्याधिकारी घोलपांकडून बनवा बनवी

## निविदा दाखवल्याच नाही, गुन्हा दाखल करा : बंडु शिंदे

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : वार्षिक निविदा प्रक्रियेबाबत अंधारात ठेवून कारभार करणाऱ्या मुजोर मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलपसह नगर अभियंता अभिषेक मराठे, कर्मचारी प्रमोद माने आणि गौरव यादव विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी बंडू शिंदे यांनी नगरपरिषद प्रशासन शाखा अधिकारी अभिजित हराळे यांच्याकडे लेखी दाखल केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना पाठविलेल्या निवेदनात शिंदे यांनी म्हटले आहे की, नगरपरिषदेमार्फत बांधकाम विभागातील काही कामासाठी काढलेल्या वार्षिक निविदा भरण्याची अंतिम मुदत १० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत होती.



शिंदे हे निविदा भरण्यासाठी सकाळी ११ वाजता नगरपरिषद कार्यालयात गेले असता संबंधित कर्मचारी नेमणूक स्थळी हजर नव्हते. त्यांच्याशी वारंवार संपर्क करूनही ते कार्यालयात आले नाहीत. निविदे बाबत माहिती देऊ नये, तसेच डिपॉझिट स्वीकारू नये अशा सूचना अभियंता मराठे यांनी माने यादव यांना दिल्याचे बंडू शिंदे म्हणाले. मुख्याधिकारी घोलप यांची मराठे यांना संमती असल्याचे शिंदे म्हणाले. निविदा नोटीस बोर्डवर जाहिरात न लावता या सर्व प्रक्रियेपासून आपल्याला दूर ठेवण्यासाठी मुख्याधिकारी घोलप यांच्यासह अभिषेक मराठे, प्रमोद माने, गौरव यादव यांनी संगणमताने प्रयत्न केला आहे, असे शिंदे म्हणाले. या सर्व त्या प्रकरणातील सत्य बाहेर येण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांचे फोन कॉल रेकॉर्ड (सीडीआर) तपासावे, तसेच सदर निविदा प्रक्रिया रद्द करून शासनाच्या नियमांनुसार नव्याने जाहिरात देत पारदर्शक पद्धतीने राबवावी, अशी मागणीही शिंदे यांनी केली आहे. दरम्यान, श्रीरामपूर नगरपालिकेत प्रचंड अनागोंदी कारभार चालू असून मुख्याधिकारी घोलप यांच्या मनमानी तसेच मुजोर वागणुकीला जनता वैतागली आहे.

घोलप यांच्यावर प्रशासकीय काळात अनेक तक्रारी आणि आरोप आहेत. या सर्व त्या बाबीची चौकशीची ही मागणी काही नागरिक करणार आहेत. त्यासाठी पालकमंत्री विखे यांची ते भेट घेणार आहेत.

# ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पायी पालखी दिंडीला प्रशासकीय सुविधा मिळाव्यात

## नियोजन बैठकीत एकमुखी मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पायी पालखी सोहळा २०२६ श्रीक्षेत्र नेवासा ते श्रीक्षेत्र पंढरपूर दिंडीच्या पार्श्वभूमीवर नुकतीच पूर्व नियोजन बैठक नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या सभागृहात पालखी दिंडीचे प्रमुख मार्गदर्शक हभप वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली सदर बैठकीत माऊलींची कर्मभूमी असलेल्या नेवासा येथून निघणाऱ्या पायी पालखी दिंडीला शासनाकडून प्रशासकीय सुविधा मिळाव्यात अशी एक मुखी मागणी वारकऱ्यांकडून यावेळी करण्यात आली.

झालेल्या नियोजन बैठकीत श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख विश्वस्त व मार्गदर्शक महंत वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के, गंगापूर येथील विठ्ठल आश्रमाचे प्रमुख महंत गुरुवर्य ह.भ.प. रामभाऊ महाराज राऊत, ह भ प सुदामदेव



महाराज आदमाने, राजाराम महाराज तूवर, प्रवीण महाराज कोरडगावकर, ह.भ.प. श्रीराम महाराज झिंजुर्के आखेगावकर,आदिनाथ महाराज भोगे, नंदकिशोर महाराज खरात, श्रीहरी महाराज वाघचौरे, श्रीराम महाराज चोपडे प्रमुख उपस्थितीत होते.शासनाच्या दृष्टीने मानाच्या सोहळयासाठी शिस्त, स्वच्छता यासह काही निकष आहेत.

ते सर्व निकष या माऊलींच्या दिंडी सोहळयामध्ये असल्याने हजारो वारकऱ्यांचा समावेश असलेल्या माऊलींच्या या दिंडीला सुरक्षासह,फिरते शौचालये,आरोग्य सुविधा शासनाने पुरवावीत अशी मागणी यावेळी सर्व महाराज मंडळींच्या वतीने करण्यात आली. गाथामूर्ती हभप रामभाऊ महाराज राऊत बाबांनी माऊलींच्या निघणाऱ्या या दिंडीसाठी शासकीय सुविधा उपलब्ध कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त करत वारकऱ्यांनी शिस्तीचे पालन करत या दिंडी सोहळयाचे वैभव कसे वाढेल यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन यावेळी बोलतांना केले. त्याच बरोबर मागील वर्षी नेवासा येथून निघणाऱ्या ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पायी पालखी दिंडीमध्ये एकूण वीस दिंड्यासह पंधरा हजार वारकरी सहभागी झाले होते त्यानुसार शासनाने या दिंडीला सवलती द्याव्यात या मागणीसह मागील वर्षी न आलेल्या इतर दिंड्यांनी माऊलींच्या दिंडीत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणीद्वारे आवाहन करण्यात आले.

सदर दिंडी ही संत ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमीतील दिंडी असल्याने शासनाने या दिंडीकडे पहावे व इतर दिंडीप्रमाणे दिंडीस सुविधा देण्यासाठी प्रयत्न करावा कारण याच भूमीतून माऊलींनी विश्वाला न्हाऊ घालणारे शब्द ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून प्रकट केले येथून निर्माण झालेले पसायदान ही विश्व प्रार्थना असल्याने माऊलींच्या या कर्मभूमीच्या दिंडीला शासनाने अधिकाधिक सुविधा देण्याचा विचार करावा अशी ही अपेक्षा अनेक महाराज मंडळींनी आपल्या भाषणातून बोलून दाखवली सदर बैठकीला नेवासा तालुक्यातील महाराज मंडळी, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग,खजिनदार ज्ञानेश्वर माऊली शिंदे,विश्वस्त कैलासभाऊ जाधव,कृष्णाभाऊ पिसोटे यांच्यासह वारकरी दिंडी चालक–मालक नेवासा नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले जनसंपर्क अधिकारी आशिष कावरे वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.